मूल्य रु.१० वार्षिक वर्गणी रु.१२० Visit: http:/www.bsmdadar.com RNI No.1262096 Title Code: MAHMAR45383 **Published on 10th June 2015**

श्री. वसंत नामे, सौ. शुभदा नामे
पार्ले येथील सुप्रसिद्ध
पार्लेश्वर वडापाव सम्राट
स्वादिष्ट वडापाव



दादर (प)येथे (सुविधाशेजारी)
समारंभासाठी बटाटावडा व समोसाच्या ऑर्डर्स स्वीकारण्यात येतील.
मराठा भुवन (सुभाष रोड), भोगले चौक (नेहरु रोड) विलेपार्ले (पूर्व) येथेही
9324047619, 9819943106

ॐ
॥ उद्धरेदात्मनात्मानम् ॥

ब्राह्मण सेवा मंडळ प्रकाशित

# स्वयम्

ब्राह्मण सेवा

जून २०१५
वर्ष १ • अंक ७



सौ. विद्या भिडे आणि सौ. वृंदा जोगळेकर

- Deepak Chheda -
98213 30817

**Chheda Modak**
**Estate Consultant**
Vile Parle/ Andheri/ Santacruz/ Goregaon
Contact for : sale-Purchase & Leave Licence of Flats, Shops, Office and **RE-DEVELOPMENT PROJECTS**

Shop No.3, Sidhachal Building,
Hanuman Road, Vile Parle (E.),
Near Cosmos Bank,
Mumbai- 400 057.
Tel.: 022-26184268/ 69, 26136954
email: chhedamodak@yahoo.com

# वर्षा सहल

ज्याप्रमाणे चातक पक्षी आतुरतेने पाऊस येण्याची वाट बघत असतो त्याचप्रमाणे मुंबईकरांना TTT सोबत पावसाळी सहलीला जाण्याचे वेध लागतात, दिवसभर हिरव्यागार निसर्गाच्या सानिध्यात पाऊस अंगावर झेलत धमाल मस्ती करायची, कोसळणाऱ्या धबधब्यात मनसोक्त भिजायचे, धुक्यात स्वतःला हरवून घ्यायचे आणि रात्री मुक्कामाच्या ठिकाणी संगीत मैफल, धमाल नाट्यप्रयोग, हास्य दरबार यांसारख्या कार्यक्रमांचा आनंद घ्यायचा

(रूचकर भोजन व नाश्ता, आरामदायी बस प्रवास, उत्कृष्ट वास्तव्य आणि काळजी घेणारी आमची माणसे.)

## माळशेज विसावा रिसोर्ट

स्विमिंग पूल, धबधबा, गुलाबाची बाग,
रेन डान्सचा आनंद,
मुक्कामाच्या रात्री मनोरंजनाचा कार्यक्रम

## निसर्गछाया - बोर्डी रिसोर्ट

समुद्रावर फेरफटका, स्थळदर्शन
स्विमिंग पूल,
मुक्कामाच्या रात्री मनोरंजनाचा कार्यक्रम

**२०-२१ जून**

प्रा. महेंद्र गणपुले यांची
**हास्य नगरी**

**२७-२८ जून**
मराठी गाण्यांची मैफल
गणेश तावडे, सायली कांबळे

**४-५ जुलै**

स्मरणात राहणारे तुफान हास्य
सदानंद चांदेकर यांची
निनिद्रा निर्मित
**हसरी उटाठेव**

**११-१२ जुलै**
कराओके ग्रुप

**१८-१९ जुलै**
काचे पलिकडचे किस्से
किशोर सोमण राजेन्द्र पाटणकर

**२५-२६ जुलै**
सूत्रधार पाऊस गाणी
मंदार भिडे

**१-२ ऑगस्ट**
दिलीप हल्ल्याळ
मृदुला मोघे



**८-९ ऑगस्ट**
'खास' महिलांसाठी खास
चैताली माजगावकर

**१५-१६ ऑगस्ट**

टिना तांबे संचालीत
निनाद नृत्यालयाचा
नेत्रदिपक नृत्याविष्कार

**२२-२३ ऑगस्ट**
पाऊस गाणी(दृक्-श्राव्य)
सादरकर्ते - अनिल हर्डीकर

**५-६ सप्टेंबर**

'पपागोष्टी'
सादरकर्ते : पपा दळवी.

**१२-१३ सप्टेंबर**
राजेश अनासने
हिंदी मराठी गाणी

## ३० ऑगस्ट एक दिवसीय वर्षा सहल - पाऊसधारा

मराठी कलाकारांच्या उपस्थितीत गाण्यांचा कार्यक्रम

Give Missed call on Toll free No.
022 614 036 49
Get TTT Tour Updates on your mobile

## त्रिगुण टुर ॲण्ड ट्रॅव्हल्स्

मोहिनी हाईटस्, शॉप नं. ४, तळ मजला, ५ वा रस्ता, एस्.व्ही. रोडच्या मागे, खार (प.), मुंबई ५२
संपर्क : खार - 86910 55748, 86910 55750, 98339 92699
वसई - 0250 - 2332524, 0250 - 2332525, 86910 55747, 86910 55749
ठाणे - 98207 49957 विलेपार्ले - 9930401908
डोंबिवली - 7045078102, 8655464062 कांदिवली - 9930729236, 9892513063
www.trigunresorts.com • ttt@triguntravels.com • tttvasai@gmail.com

# "तर सांगायचं म्हणजे.."

नमस्कार मंडळी,

आपण सगळेच पावसाची अगदी चातकासारखी वाट पहातोय. नेहमीप्रमाणे वाऱ्याचा वेग अचानक मंदावलाय आणि यंदा लवकर पाऊस येईल हा अंदाज खोटा ठरलाय. 'स्वयम्' चा हा अंक तुमच्या हाती पडेपर्यंत पावसाला सुरूवात होईल अशी आशा करुया.

बच्चेकंपनी, आता शालेय नववर्षाच्या तयारीला सुरुवात झाली ना? कोऱ्या वह्या, नवीन पुस्तके आणून त्याला कव्हर घालणे, लेबल्स लावणे, नवीन सॅक, युनिफॉर्म आणि त्याच्या जोडीला पावसाची तयारी. नवीन वर्ग, नवीन शिक्षक, नव्याने वर्गात येणारे नवे सवंगडी, या सगळ्याची उत्सुकता शिगेला पोचली असेल.

१२वीच्या परीक्षेत भरघोस यश मिळवलेल्या सर्व विद्यार्थी मित्रमैत्रिणींचे मन:पूर्वक अभिनंदन! आणि १०वी च्या विद्यार्थ्यांना खूप खूप शुभेच्छा.

१८ मे २०१५ रोजी ॲड. अविनाश भिडे यांचे कायदाविषयक प्राथमिक माहिती देणारे भाषण व तदूनंतर प्रश्नोत्तराचा कार्यक्रम खूप उदूबोधक झाला. या अंकात अन्यत्र या कार्यक्रमाचा गोषवारा देत आहे.

२ जून २०१५ रोजी सकाळी ७ ते १२ दरम्यान दरवर्षीप्रमाणे वटपूजन करण्यासाठी भगिनी जमल्या होत्या. स्त्री सांस्कृतिक समितीच्या सर्व कार्यकर्त्यांनी चोख व्यवस्था ठेवली होती.

मंडळाने ६-७ जून रोजी शाडुच्या मातीची गणपती मूर्ती बनवण्याची कार्यशाळा आयोजित केली होती. यासंदर्भात अनेकांनी काही धार्मिक काही तांत्रिक स्वरुपाच्या शंका, अडचणी आमच्याकडे व्यक्त केल्या. काहींच्या म्हणण्यानुसार इतक्या लवकर मूर्ती तयार केली तर गणेश चतुर्थी (सप्टेंबर मध्ये) पर्यंत सांभाळणे जोखमींचे होईल असाही विचार व्यक्त केला. याचा सारासार विचार करून आम्ही कार्यशाळा पुढे ढकलली आहे. याच अनुषंगाने कार्यशाळेत मूर्ती कशी घडवली जाईल याचे प्रात्यक्षिक दि. २७ जून ला सायंकाळी ६-८ यावेळेत मंडळाच्या बहुतुले सभागृहात आयोजित केले आहे. त्याच जोडीला सर्व शंकांचे निरसन करण्यासाठी प्रश्नोत्तराचा कार्यक्रमही होईल. ५ जूनच्या पर्यावरण दिनाचे औचित्य साधून जून महिन्यात हा कार्यक्रम पर्यावरण रक्षणाच्या सवयीचा एक भाग म्हणून आयोजित केला आहे. सर्वांना यात सहभागी होण्यासाठी आग्रहाची विनंती करीत आहे.

चला तर मग, वरील कार्यक्रमाला भेटूच.

धन्यवाद.

सौ. कल्पना साठे

## श्रींची मूर्ती आपणच तयार करा

दिवसेंदिवस वाढत असलेल्या प्रदुषणाला आळा घालण्यासाठी आपणच घरच्या घरी बाप्पाची शाडू मातीची मूर्ती तयार करुया. त्याचीच पूजा करु आणि घरच्या घरीच त्याचे विसर्जन करुया. आहे ना अभिनव कल्पना ?

दि. २७ जून रोजी संध्याकाळी ६ वाजता ब्राह्मण सेवा मंडळात पर्यावरण स्नेही शाडूची मूर्ती गणपती बनविण्याचे प्रात्यक्षिक दाखवतील. त्याचबरोबर उपस्थितांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम होईल. सर्वांना आग्रहाचे निमंत्रण.

कार्यकारी संपादक
- सौ. कल्पना वसंत साठे

स्वयम् संपादकीय मंडळ
- श्री. विनायक कृष्णाजी लेले
- श्री. संतोष बाळकृष्ण वैद्य
- श्री. अभय अनंत सावरकर
- सौ. अधिता अर्चिस लेले
- सौ. नीला विद्याधर वैशंपायन

संपादन सहाय्य
- हर्डीकर ॲण्ड असोसिएटस्

मुखपृष्ठ
- प्रज्ञा हरणखेडकर

अंक सजावट व मांडणी
- एपीज डिझाईन ॲण्ड प्रिन्टस्

संपादकीय विभाग पत्रव्यवहार
- स्वयम्, ब्राह्मण सेवा मंडळ,
  भवानीशंकर रोड, दादर (प),
  मुंबई ४०० २८

दूरध्वनी : २४२२९११८, २४३७१९४९

कार्यालयीन वेळा : (रविवार बंद)
- सकाळी ८.३० ते १२.३०
  सायंकाळी ४.३० ते ८.३०

ई-मेल : svayambsm@gmail.com
वेबसाईट :www.bsmdadar.com

# ये रे ये रे पैसा...

## स्थावर मालमत्ता - गरज जास्त, गुंतवणूक कमी

-जयंत विद्वांस

Rich शब्दातील R म्हणजे 'रियल इस्टेट' किंवा 'स्थावर मालमत्ता' या भरघोस फायद्याच्या गुंतवणूकीबद्दल आज पाहू या. शेअर बाजारातील गुंतवणूक लहानात लहान अगदी रु. ५००/- ते रु. १०००/- पासून करता येते. दरमहा ठराविक रक्कम गुंतवता येते. स्थावर मालमत्तेत गुंतवणूक खूप मोठी होते. दरमहा हप्तेसुध्दा लाखांत जातात.

एक काळ असा होता की, प्रत्येक जण म्हणत असे, ''गिरगावातला माणूस गोरेगावात फेकला गेला. तिकडून बोरीवली किंवा ठाण्याला उडी मारली.'' मराठी माणसाला या विचारसरणीतून बाहेर यायला थोडा वेळ लागला. परंतु आज सर्वसामान्य मध्यमवर्गीय सेकंड होम किंवा हॉलीडे होम्सचा विचार करू लागला आहे. आज मराठी दैनिकातून आधुनिक जीवनशैली, नवीन रहाणीमानाच्या दृष्टीने योग्य अशा पानभर जाहिराती येवू लागल्या आहेत. आपल्या आर्थिक सुबत्तेचे प्रतिबिंब आपण या जाहिरातीतून शोधत असतो.

साधारणपणे वयाच्या २५ ते ३० दरम्यान माणूस गरज म्हणून घर खरेदी करतो. त्या वेळच्या आर्थिक परिस्थितीनुसार घर लहान-मोठे घेतले जाते. वयाच्या ३० ते ३५ दरम्यान मासिक उत्पन्नात वाढ झालेली असते व आधीच्या घराचे हप्ते अंगवळणी पडलेले असतात. किंबहुना आता ते खूपच लहान वाटू लागतात किंवा उरलेले कर्ज एकरकमी फेडून टाकण्याची ऐपत आलेली असते. ३३ ते ३७ वयाच्या दरम्यान दुसऱ्या घराचा विचार केला जातो. म्हणजे पुढील पंधरा वर्षात कर्ज संपून निवृत्तीसाठी नियोजन करण्यास त्यापुढे ८ ते १० वर्ष मिळतात. दुसरे घर खूपदा 'निवृत्तीनंतर शांतपणे रहाण्याची सोय' ह्या दृष्टीने घेतलेले असते. परंतु अजुनही त्याच्याकडे गुंतवणूक किंवा 'जागा हीच निवृत्ती-वेतनाची सोय' म्हणून (गुंतवणूक) पाहिले जात नाही. गुंतवणूक म्हणून विचार केल्यास त्या मध्ये खालील पर्याय येतात - १. दुसऱ्या शहरांत किंवा आपल्या जवळपास दुसरे घर २. ऑफिस ३. दुकान ४. जमीन-जुमला ५. सेझ ६. हॉटेल किंवा सर्विस अपार्टमेंट

ऑफिस, दुकान किंवा सर्विस अपार्टमेंटमधील गुंतवणुकीवर वार्षिक परतावा ६ टक्के पर्यंत असतो (दरमहा भाडे अंदाजे, मूळ किमतीच्या अर्धा टक्का) हाच घरातील गुंतवणुकीवर ३ ते ४ टक्के असतो. बाह्य परिस्थितीनुसार हा परतावा वाढू शकतो. मध्यवर्ती भागात जास्त असतो. परंतु सर्वसामान्य गुंतवणूकदार आयकर सवलती लक्षात घेऊन आणि स्वस्त कर्ज उपलब्धी विचारांत घेऊन घर खरेदीस पसंती दर्शवतात. घर कर्जावरील व्याज एक लाख पन्नास हजार वजावटीस पात्र होते व मुद्दल परतफेड रु. एक लाख पर्यंत वजावटीस पात्र होते. साधारणत: रु. १८ लाख कर्ज १०.७५% व्याजाने पंधरा वर्षासाठी घेतल्यास आयकर सवलती विचारात घेऊन हा दर ६.५% इतका कमी होतो. घर भाड्याने दिल्यास फायदा अजूनही वाढतो.

गुंतवणुकीचा अवधी विचारात घेऊन या गुंतवणुकीची वर्गवारी तीन प्रकारात करता येते.

**१. दीर्घ मुदत, जास्त जाखीम, जास्त परतावा**

शहराच्या बाह्य सीमा भागातील जमिनीत गुंतवणूक - या भागातील शेत जमिनीची खरेदी करून हा भाग शहराच्या हद्दीत समाविष्ट झाल्यावर विकासकांस विकणे. हा काळ दहा ते पंधरावर्षे असू शकतो. दीर्घ मुदतीत परतावा प्रचंड असतो परंतु जोखीमपण खूप असते. शहराच्या सीमा रुंदावण्यास जास्त काळ जाऊ शकतो. कदाचित आपण खरेदी केलेल्या भागाचा विकास उशिरा होऊ शकतो.

**२. मध्यम मुदत, मध्यम जोखीम, मध्यम परतवा**

यात आजुबाजुचा भाग विकसित होऊ लागलेला असतो. उदा. बांधकाम चालू असतांना सदनिका नोंदवणे.

आपल्याला जागेचा ताबा मिळेपर्यंत संपूर्ण भाग विकसित झालेला असतो. यासाठी पाच ते सात वर्षे कालावधी जाऊ शकतो.

**३. कमी मुदत, कमी जोखीम, कमी परतवा**

संपूर्ण विकसित भागातील जागा खरेदी करणे - यात परतवा कमी असतो. तरीसुद्धा तो दीर्घ मुदतीत जास्तच असतो.

जागांच्या किंमती साधारणत: पाच ते सहा वर्षांत दुप्पट होतात (परिस्थितीनुसार फरक पडू शकतो) कर्ज काढून जागा घेतल्यास कर्ज कमी होत जाते व कर्ज फिटेपर्यंत दर चौपट झाले असतात. जितके कर्ज जास्त तितकी आपली गुंतवणूक कमी व परतवा जास्त. उदा. रु. ४०००/- प्रती स्क्वे. फुट दराने हजार फूट जागा नोंदणी केल्यास आपली रक्कम ३० टक्के व कर्ज ७० टक्के धरल्यास, बांधकाम पूर्ण होऊन ताबा मिळेपर्यंतच्या कर्जावर व्याज भरावे लागेल त्या प्रमाणात हा फायदा कमी होईल. मुंबई सोडून इतर शहरात हे शक्य आहे.

आर्थिक नियोजनकार म्हणून हा पर्याय विचारात घेतांना अशिलाचे आवक-जावक पत्रक (Fund Flow Statement), उत्पन्न, कर्जाचा हप्ता मिळणारे भाडे, पर्यायी गुंतवणुकीचा अपेक्षित परतवा आणि गुंतवणूक संतुलन (Portfolio Balancing) याचा साकल्याने विचार करून मार्गदर्शन करतो. वेळप्रसंगी जागेची निवड करण्यासही मदत करतो.

इतर कोणत्याही वस्तूप्रमाणे जागांच्या किंमती मागणी व पुरवठा यानुसारच ठरतात. भारताची लोकसंख्या आणि प्रामुख्याने सुशिक्षित तरुणांची संख्या लक्षात घेता, भारतात जागांची मागणी कायमच वाढत रहाणार. परंतु किंमती आवाक्याच्या बाहेर जाऊ लागल्याने मुंबईत जागाची खरेदी/विक्री कमी झाली आहे. पण जागांचे दर कमी होत नाहीत. पुढील काही वर्षे भाव स्थिर रहातील (जसे १९९३ ते २००२ पर्यंत होते) त्याला कारण, सर्वांना माहित असलेले उघड गुपित - रोख व्यवहार. स्विर्झलँडच्या बँका गुंतवणुकीवर व्याज देत नाहीत, उलट जागेत गुंतवलेला पैसा आपल्या समोर स्वर्ग असतो.




# Airmate A Multibrand A.C.Showroom

S.S.Dealers, LG, VOLTAS LIMITED, HITACHI Inspire the Next, Panasonic, VIDEOCON, BLUE STAR, SAMSUNG, DAIKIN, Carrier

**Service Range:**
- Gift on every purchase
- Exchange old with new A.C.
- Immediate delivery & installation
- On Annual Maintenance Contract
- On rental basis
- Guaranteed repairs of Indian & Imported ACs

0% Finance

Showroom : Dattatray Niwas, Shop No. 3,
'B' Block, Opp. Portugese Church,
S. K. Bole Road, Dadar(W), Mumbai 28
T: 24301910, 24313073, 24302993
M: 9820043019
E: alhadaircon@yahoo.co.in
W: alhadaircon.com


भारताची जशी प्रगती होत जाईल तसा जास्त परकीय गुंतवणुकदारांचा ओघ भारताकडे या क्षेत्रात येईल. सध्या काही संस्थात्मक गुंतवणुकदार या दृष्टीने भारतात कार्यरत आहेत. रुपयाचे अवमूल्यन झाल्याने परदेशस्थ भारतीय मोठ्या प्रमाणात भारतात जागा खरेदी करीत आहेत. मुंबईत मराठी वस्तीत व पुण्यात काही ठिकाणी परदेशस्थ मराठी बांधवांसाठी (फक्त त्यांच्याचसाठी) गृहनिर्माण प्रकल्प येऊ घातले आहेत. सर्व सुखसोयी परदेशी जीवनशैलीप्रमाणे असतील.

मुंबईतील प्रत्येक मराठी माणसास पुण्यात आपले घर असावे असे वाटते.डेक्कन जिमखाना मध्यवर्ती ठिकाण मानल्यास १५ ते १६ किलोमीटरच्या त्रिज्येत पुण्याची वाढ होत आहे. आज मुंबईचा विचार केल्यास चर्चगेट ते बोरीवली हे अंतर अंदाजे ३० किलामीटर आहे. बंगलोर शहराशी (आय.टी.उद्योगाच्या दृष्टीने) तुलना केल्यास पुण्याच्या मर्यादा वाढण्यास अजून वाव आहे. आय.टी. उद्योगामुळे पैसा खर्च करण्याची वृत्ती येते. म्हणून जागांच्या किंमती वाढण्यास वाव आहे. या उलट मुंबई-नाशिक आग्रा रोड कितीही रुंद केला म्हणून नाशिकचे औद्योगीकरण झाले तरी आय.टी.उद्योग पुण्याप्रमाणे फोफावला नाही. नाशिककरांनो माफ करा.

मुंबईत मध्यमवर्गीयांसाठी परवडणारी लहान घरे या क्षेत्रात प्रचंड मागणी असुनही 'निर्माण' सारखे एखाद-दुसरे विकासक वगळता कोणीही लक्ष घालत नाहीत. यांत परतवा खूप आहे.

परदेशांप्रमाणे, भारतात गुंतवणुकीसाठी रियल इस्टेट म्युच्युअल फंड अस्तित्वात नाहीत. म्युच्युअल फंड तयार झाल्यास लहान गुंतवणुकदारांच्या फायद्याचे होईल. अर्थातच गुंतवणूक दीर्घ मुदतीसाठीच करावी लागेल. कदाचित एस. आय.पी. सारखी सुध्दा प्राप्त होऊ शकेल.

भारतात रियल इस्टेट म्युच्युअल फंड नसतील तरी गुंतवणूक व्यवस्थापन सेवा (Portfolio Management Schemes) किंवा पी.एम.एस. सुविधा उपलब्ध आहेत. यात कमीतकमी गुंतवणूक रु. २५ लाखच्या जवळपास करावी लागते. गुंतवणूक कालावधी कमीतकमी तीन ते पाच वर्षे असतो. मुदतीआधी रक्कम काढता येत नाही. काढल्यास नुकसान खूप होते. जमीन खरेदीच्या सुमारास विकासकांशी सहकार्य/सामंजस्य करार करून रक्कम गुंतवली जाते. म्हणून प्रकल्प पूर्ण होण्यास पाच वर्षांचा कालावधी जावा लागतो. रक्कम ख्यातनाम विकासकांच्या व प्रमुख शहरातील मोठ्या प्रकल्पात गुंतवली जाते. स्वाभाविकत: परतवा चांगला मिळणे अपेक्षित असते.

म्युच्युअल फंड, ठेवी, रोखे यासाठी मानांकन (Rating) पध्दत अस्तित्वात आहे. योजना किती चांगली अथवा वाईट आहे हे गुंतवणुकदार यावरून ठरवू शकतो. ही सुविधा स्थावर मालमत्तेसाठी त्या स्वरूपांत उपलब्ध नाही .डोनॉल्ड ट्रंप यांच्याप्रमाणे काही विकासकांनी आपल्या नावाचा ब्रँड निर्माण केला आहे. त्याचा ते रेटिंगसारखा वापर करतात.

सेबी तसेच विमा नियामक प्राधिकरण (आय आर डि ए) पेंशन नियामक (पी एफ आर डी ए), दूरसंचार नियामक प्राधिकरण (टी आर ए आय) प्रमाणेच स्थावर मालमत्ता नियमन संस्था अस्तित्वात नाही. मागील सहा वर्षे हे प्रयत्न चालू आहेत. दर दोन वर्षांनी सरकार हे विधेयक संसदेत (आधीच्या मसुद्यापेक्षा सौम्य करून) सादर करायचे ठरवते. ज्या वेळेस हे विधेयक संसदेत संमत होईल त्या वेळेस तो 'विकासक धार्जिणा' कागदी वाघ असेल. सेबी प्रमाणेच गुंतवणुकदारांचे हित जपले जाईल का ? ही शंकाच आहे.

(लेखक सेबीद्वारा नोंदणीकृत गुंतवणूक सल्लागार आहेत.)




**जयंत विद्वांस**
9892202011
jayantvidwans61@rediffmail.com

# हसतं-लिखित

## पार्श्वलेखन

**- अनिल हर्डीकर**

'पार्श्व' पासून सुरू होणारे पार्श्वभाग, पार्श्वभूमी, पार्श्वसंगीत, पार्श्वगायन, पार्श्वसूचक हे शब्द तुम्हाला नवीन नाहीत. मी आज ज्या पार्श्वलेखनाविषयी लिहिणार आहे ते लेखन संगीत किंवा गायनाप्रमाणे चित्रपटातून असणारं नाही. दुचाकी, तीनचाकी वाहनांच्या पार्श्वभागावर लिहिलेल्या मजकुराविषयी कुणीतरी पुढे होऊन लिहिले पाहिजे म्हणून मी ते लिहितोय.

**'OK'** असं ट्रक, लॉऱ्यांच्या मागे का लिहितात ते लिहिणाऱ्यांनाही ठाऊक नसावं. बॉडी बांधून झाली की, इन्स्पेक्शन ऑफिसरच 'OK' असा स्टँम्प मारतो अशी माझी शंका आहे. **'हॉर्न'**आणि **'प्लीज'** या दोन शब्दांमध्येच **'OK'** असं लिहिलेल्या सगळ्या लॉऱ्या किंवा ट्रक ओकांचे आहेत, असा अल्पकाळासाठी का होईना माझा समज होता.

**'थांब लक्ष्मी कुंकू लावते'**, **'संथ वाहते कृष्णामाई'** हे मराठी गाजलेले चित्रपट, पण त्यांची नावं भविष्यात इतकी चालतील, गावोगावी ट्रकसोबत जातील याची निर्मात्यांना देखील कल्पना नसेल.

**''सरफरोशी की तमन्ना अब हमारे दिलमें है देखना है जोर कितना बाजू ए कातिल में है''**

असा शेर पार्श्वभागावर वागवणारा एक ट्रक कर्नाळ्याच्या घाटदार जंगलात एक बाजू निकामी होऊन पडलेला मी पाहिला आहे.

**'आई-बाबांचा आर्शिवाद'** (आशीर्वाद हा शब्द शुद्ध लिहिलेला आढळल्यास तो अपघाताने आहे असे समजावे) **'अण्णांचा आशीर्वाद'**, **'अक्काची पुण्याई'** अशी आभारपत्रंही आपण रिक्षांच्या पार्श्वभागी पाहिली असतील.

एकदा एका आडगावात तीन प्यासिंजरांच्या रिक्षेतून नऊ प्यासिंजर पायउतार होताना मी उघड्या डोळ्यांनी पाहिले. अशी रिक्षा चालवतात कशी? आणि अशी रिक्षा कशी चालते? या दोन्ही प्रश्नांचे एकच उत्तर **'आबांची पुण्याई'** असं रिक्षेच्या पार्श्वभागी लिहिलेलं होतं. काही रिक्षांच्या पार्श्वभागाला फळा समजून मजकूर लिहिलेला असतो. एकदा एका रिक्षामागे तीन नट्यांची नावे लिहिली होती. **ऐश्वर्या, सुश्मिता, लारा**. त्याखाली **'जगदीशाची कृपा'** असं लिहिलं होतं. मी रिक्षाचालकाशी वार्तालाप केला. म्हणालो, ऐश्वर्या, सुश्मिता, लारा या तिघी तुमच्या आवडत्या का? ''हे काय विचारणं झालं? धंदा बंद करून गेलो की....अहो साहेब या तिघी माझ्या पोरी....तिन्ही माझ्या पोरींची नावं....'' त्यानं खुलासा केला. मग हा जगदीश कोण? मी विचारलं. ''मला लोन दिलं म्हणून जगदीशाची कृपा असं लिवलंय'' लिहिल्या मजकूराचा खरा अर्थ आणि लागणारा अर्थ यात एवढं अंतर होतं.

**'येता का जाऊ?'** अशी धमकी पार्श्वभागी मिरवणारे रिक्षावाले असतात. **'१ ३ मेरा ७'** हा हायब्रीड लेखनप्रकार गल्लोगल्ली फिरवणारे रिक्षावाले आहेत. **'फिर मिलेंगे'** चा वादा करणारे वळणावळणावर भेटतात. मजकूर सुवाच्य असूनही कधी कधी अर्थबोध होत नाही. **'इस्पीट की मजा, मोत की सजा'** याचा अर्थ समजावून घेण्यासाठी मी दहा मित्रांची डोकी खाल्ली. शेवटी त्याचा अर्थ इस्पीट म्हणजे स्पीड म्हणजे वेग आणि मोत म्हणजे मृत्यु, असा लावल्यावर अवघा आनंद झाला. **'किस मी नॉट'** चे, भारी भाषांतर **'चिटके तो फटके'** असे वाचले. **'सुरक्षित अंतर ठेवा'** असा सुविचारही काही रिक्षांच्या पार्श्वभागी वाचायला मिळतो. **'बायकोपेक्षा मेव्हणी बरी'** असं लिहिलेल्या रिक्षात बसायला गेलेलं गिऱ्हाईक शेजारच्या रिक्षेत डेक पाहून, पहिली रिक्षा सोडून गेलेलं मी पाहिलंय. या पार्श्वलेखनात मजकूर अशुद्ध असला तरी भावना विशुद्ध असते. **'तू श्रीप हा बोल'** असा अनाकलनीय मजकूर, शब्दसमूह मी एका रिक्षामागे वाचला. एक जोडाक्षरही नसलेल्या या मजकुराचा अर्थ 'लागेचिना, लागेचिना' अशी माझी भारूड अवस्था झाली. त्यात मजकुरात मध्ये मध्ये शोभेचे दिवे येत होते. मी बराच विचार केल्यानंतर मानसिक थकवा आला तसा रिक्षा मालकास शरण गेलो. त्यानं केलेल्या निरुपणावरून त्या मजकुराचा अर्थ **'तू सिर्फ हाँ बोल'** किंवा शुध्द मराठीत **'तू फक्त हो म्हण'** असा होतो.

एकदा साकीनाक्याच्या सायंकालीन ट्राफीक (टेरिफीक) जाममध्ये मी रिक्षात अडकलो होतो. मी ज्या रिक्षात बसलो होतो त्याचा मालक हा मूळचा पायलट असावा. त्याला दुसरं कोणतेही वाहन त्याच्यापुढे गेलेले सहन होत नसे. मी त्याला म्हटलंही, ''अरे तो पुढचा रिक्षावाला काल निघालाय, आपण आज निघालोय तर तो असणारच पुढे'' त्याला ते पटलं नव्हतं. डावं-उजवंही न करता तो 'सदैव सैनिका पुढेच जायचे' म्हणत आगेकूच करीत होता. जामयात्रेत सर्व चाकी प्रकारची वाहने सहभागी झाली होती.टॅक्स्या होत्या, रिक्षांचा हिशोब नव्हता. जीप होत्या, बशी होत्या, बेस्टही आणि वर्स्टही. देशाच्या वाढत्या वाहनांच्या वाढत्या वाहन समस्यांचा विचार करीत होतो. चुरचुरणारे डोळे चोळून पाहिलं तर पुढच्या रिक्षाच्या पाठीमागे लिहिलं होतं, **'हे असंच चालायचं.'**




**'हम 77 है'** चा अर्थबोध मला झाला नाही. मी तीच रिक्षा पकडली. आश्चर्य म्हणजे कधी नव्हे तो रिक्षाचालक मराठी निघाला. मी ज्ञानलालसेपोटी त्याला विचारले, 77 म्हणजे काय?

तो चिडला. म्हणाला, 'शिकलेले दिसताय, माझी चेष्टा करताय का?'

चेष्टा कशाला? तुमच्या रिक्षावर 'हम सत्याहत्तर है' लिहिलंय ते काय? मी.

काय बी वाचताय राव. ते 'हम 7, 7 है' असं वाचायचं.

**'मेरा देश महान'** हे लिहिणाऱ्यास टोल माफी असावी असा संशय यावा इतक्या ट्रकांच्या मागे मी हा देशभक्तीय मजकूर वाचलाय. एकदा नाही म्हणायला ज्वलनशील तेल घेऊन जाणाऱ्या ट्रकच्या मागे **'मेरा देश महान' Highly Inflammable** असं देशाचं वास्तव चित्रणही वाचलं होतं. एकदा गर्दीच्या रस्त्याला एक गर्भश्रीमंत गाडी वेगानं शेजारून गेली. सायकलवाला मांजरीसारखा आडवा गेल्यानं गाडीच्या ड्रायव्हरने करकचून ब्रेक लावला. त्या गाडीच्या मागे **As a matter or fact, this road belongs to me** अशी आगाऊ माहिती दिली होती.

**'बुरी नजरवाले तेला मू काला'** यामध्ये मूँह असा शब्द लिहिलेला आढळल्यास तो ट्रक दाखवा आणि हजार रुपये मिळवा, अशी माझी ऑफर आहे.

**'आती क्या खंडाला?'** असं पार्श्वभागी (रिक्षाच्या) लिहिलेल्या रिक्षामालकास वाहतूक पोलिसानं पकडून परमिट दाखवायला लावलं आणि मुंबई क्षेत्राबाहेर जाण्याच्या शक्यतेवरून त्याच्याकडून पावती फाडली, असं चंद्या नानिवडेकरनं मध्यंतरी मला सांगितलं. मी त्यावर विश्वास ठेवला नाही. थापा मारण्याचा त्याचा छंद मला माहित्येय. अशा निर्हेतुक थापा तो मारीत असतो. त्याचा तोटा नाही, दुसऱ्याचं नुकसान नाही.

काल मी घराबाहेर पडलो, तर समोर चंद्या. मी चाललो होतो पिक्चर टाकायला. चंद्या ''कुठे चाललास?'' विचारणार हे मला माहिती होतं. चंद्यानं भरल्या तोंडानं, भिवयांनीच मला ''कुठे?'' विचारलं.

मी म्हटलं ''लतादीदींकडे चाललोय. प्रभुकुंजात''.

तोंडातल्या चैतन्यचूर्णाची मागच्या भिंतीवर रंगपंचमी खेळून चंद्या म्हणाला, ''नाक्यावर एक टॅक्सी उभी आहे, ती पकड. त्यानं जसलोकपर्यंत जा, चकटफू. पुढे चालत जा प्रभुकुंजापर्यंत''

मला राष्ट्रगीत चुकवायचं नव्हतं म्हणून मी दुर्लक्ष करून पुढे चालत राहिलो. नाक्यावरच्या एका टॅक्सीवर मोठ्ठ्या ठळक अक्षरात लिहिलं होतं, **'कोणत्याही धर्माच्या गरीब आणि आजारी व्यक्तीला इस्पितळात मोफत पोहोचविण्यात येईल.'**



**-अनिल हर्डीकर**
स. क्र. ५२७० | **9819421858**
hardikarsutradhar@gmail.com

**जगाच्या पाठीवर कुठेही जा, मात्र**
**ट्रॅव्हल इन्शुरन्स पॉलिसी**
**आमच्याकडूनच घ्या**



- **वय वर्षे ९९ पर्यंत वैद्यकीय चाचणीची आवश्यकता नाही.**
- **पॉलिसी ५०,००० डॉलर्सपासून ५ लाख डॉलर्सपर्यंत उपलब्ध.**
- **आम्ही कोणत्याही इन्शुरन्स कंपनीची पॉलिसी देतो.**
- **प्रिमियमचे दर अत्यंत माफक**
- **पॉलिसीची संपूर्ण माहिती, त्याची संपूर्ण सेवा त्वरित देण्याची व्यवस्था करतो.**
- **आपला काही क्लेम असेल तर आपल्याला संपूर्ण मार्गदर्शन करुन आपली नुकसानभरपाई मिळेपर्यंत सेवा.**

**श्री. अनंत पु. गोखले**
**भ्रमणध्वनी : 9869526152**
**दूरध्वनी : 26832233**

**इ-२/७०३, विजयनगर सोसायटी,**
**स्वामी नित्यानंद मार्ग,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०६९.**
**email: anant2611@yahoo.co.in**

# ब्रह्मभूषण

## शृंखला

**- सुरेश (रा.त्रिं.) बर्वे**

**आशानाम् मनुष्याणां शृंखला काचिद् अदभुता**
**यया बध्दा: प्रधावन्ति मुक्तास्तिष्टन्ति पंगुवत् ।**

ही शृंखला जवळ नसेल तर माणसाचे जगणेच अत्यंत त्रासदायक व क्लेशकारक होईल. इतके की त्यामुळे ह्या शृंखलेशिवाय माणूस जगणे जवळजवळ अशक्य. पण मी आज लिहिणार आहे ती शृंखला वेगळीच आहे. तिची जरूरी तर अजिबात नसते. किंबहुना ती एक बेडीच होते. तरीपण माणूस ह्या बेडीत स्वत:ला अडकवून घेतो व स्वत:चे जीवन समृध्द बनवतो. ते बघून दुसरा तसाच स्वत:ला अडकवतो. मग तिसरा, चौथा असे अनेक. मग ह्यांचीच एक शृंखला होते.

१९५८ चा जून महिना होता. मला त्यावेळच्या इंटर सायन्स परिक्षेत उत्तम गुण मिळून इंजिनिअरींगला सहज प्रवेश मिळाला. मी जरा हवेतच होतो. कारण माझ्या जगात (गोरेगावकर वाडी म्हणजे सहा चाळी,सुमारे १८० ब्राह्मण कुटुंबे) माझा भाव वधारला होता. लोकांच्या नजरेत मला ते जाणवत होते. तेव्हाच मला आमच्या शाळेचे प्राचार्य काळे ह्यांनी त्यांच्या घरी बोलावले. ते आमच्याच वाडीत रहात असत. मी भेटायला गेलो तेव्हा काळे सरांनी माझे स्वागत केले. मला त्यांच्या स्वयंपाकघरात एक देव्हारा होता त्याजवळ पाट मांडून बसवले. काळेमामींनी मला मसाल्याचे दूध प्यावयास दिले. त्यानंतर काळे सरांनी माझ्या हातावर एक पेढा व एक पाकीट ठेवले. त्यात ६०० रुपये होते. माझ्याकडून रुपये ६०० मिळाले व त्याचा उपयोग मी शिक्षणाकरता करेन असे लिहून घेऊन माझी सही घेतली व माझे इंजिनिअरींगचे शिक्षण पुरे करेपर्यंत मला महिना रु. ५० ह्याप्रमाणे वर्षाचे रु.६०० अशी एक शिष्यवृत्ती मिळणार असल्याचे सांगितले. कल्पना करा, त्यावेळचे ६०० रुपये म्हणजे आजचे २५ ते ३० हजार रुपये मोलाचे होतील.

मी अवाक तर झालोच पण विलक्षण नम्र झालो. अत्यंत अल्प वेतनावर शाळेत काम करणारे काळेसर आम्हा विद्यार्थ्यांचे उच्चशिक्षण नीट पार पडावे म्हणून धनिकांसमोर हात पसरत असत व ज्याला दान द्यावयाचे आहे त्या विद्यार्थ्याला आपल्या देवाच्या शेजारी स्थान देऊन दान देत. काळेसरांनी कधीच उल्लेख केला नाही पण माझ्यासारख्या ३०-४० विद्यार्थ्यांना त्यांनी अशीच मदत केली होती. असे काळेसर व स्वत:च्या नावाचा कुठे उल्लेखही न होऊ देणारे असे धनिक आज आढळणार नाहीत.

वस्तुत: अभिमान बाळगावा अशा पुष्कळ गोष्टी त्यानी पूर्वायुष्यात संपादिल्या होत्या. काळे सर म्हणजे विष्णू कृष्ण काळे. आमच्याच शाळेतून म्हणजे गिरगावातील आर्यन शाळेतून त्यानी १९१६ साली तीक्ष्ण बुध्दीमत्ता व प्रयत्न यांच्या जोरावर मॅट्रिकच्या परीक्षेत पहिली जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ती मिळवली होती व एम. ए. च्या परीक्षेत भांडारकर पारितोषिक मिळवले होते. त्यांचे सहाध्यायी मित्र म्हणजे कॉम्रेड शंकरभाऊ देशपांडे, मोरारजी देसाई, धारासणा मीठ सत्याग्रहाचे सेनानी मणीलाल पारेख, हायकोर्टाचे जज्ज झालेले न्या. शहा, संपादक श्री. शं. नवरे वगैरे मंडळी होती. शंकरभाऊ व काळेसर महाविद्यालयीन शिक्षण काळात गोकुळदास तेजपाल बोर्डींगमध्ये रहात असत. दोघांचेही आय.सी.एस.ला जाण्याचे नक्की ठरले होते. पण शंकरभाऊ गांधीजींच्या असहकार चळवळीत सहभागी झाले आणि काळेसर आपल्याच म्हणजे आर्यन शाळेची आजन्म सेवा करायची म्हणून आर्यन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सभासद झाले.

शाळेला स्वत:ची इमारत नव्हती. तेव्हा फार संपन्न नसलेल्या महाराष्ट्रीय मध्यमवर्गातूनच कुठे शंभर तर कुठे दोनशे अशा देणग्या गोळा करत. त्यांनी शाळेची भव्य वास्तू उभी केली. त्यानंतरही गोरेगांवकर वाचनालय, नवाथे ह्यांचे देणगीतून उभे केलेले कलायतन व रुईया शेटजींच्या देणगीतून बांधलेला शाळेचा पाचवा मजला! हे सर्व काळेसरच करू जाणे. लोकमान्य पुण्यतिथी, श्रीकृष्ण जयंती, गॅदरींग, विविध स्पर्धा, चित्रकला प्रदर्शन, क्रीडास्पर्धा, सहली वगैरे कार्यक्रमांची सुरवात काळे सरांमुळेच झाली. मुलींच्या शाळेचा स्वतंत्र विभाग असलेल्या शारदासदनसाठी स्वत:ची इमारत उभी करायचे त्यांचे स्वप्न मात्र अपुरे राहिले. त्यांचा आपल्या सेवा मंडळाशी अप्रत्यक्ष संबंध आला. त्यांचे जावई कै. माधवराव नेने आपले ६ वर्षे उपाध्यक्ष होते. ह्याचा उल्लेख करणे आवश्यक आहे.



कै. व्ही. के. काळे

काळानुसार आम्ही विद्यार्थी आपापल्या व्यवसायात स्थिरावलो. पण काळेसरांबाबत बोलणे होतच राहिले. तेव्हा त्यांनी २५-३० मुलांना तरी उच्चशिक्षणात शिष्यवृत्ती दिली होती. तेव्हा त्यांचेच हे कार्य पुढे चालवून थोडेतरी उतराई व्हावे हा विचार आम्हा मित्रांच्या मनात घोळत असे. पण काहीतरी नक्की घडायला २००० साल उजाडले. त्यावर्षी आम्ही ही शिष्यवृत्ती मिळवलेल्या विद्यार्थ्यांनी मेसार्ग एज्युकेशनल ट्रस्ट हा एक ट्रस्ट स्थापन केला व भारतातील विद्यार्थ्यांना अमेरिकेत पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रत्येकी १००० डॉलर एवढी रक्कम देण्यास २००१ पासून सुरवात केली. दरवर्षी ४-५ विद्यार्थी आम्ही निवडत असू. तेव्हा सेवा मंडळ अशा मुलांना विमानाच्या तिकिटाचे पैसे देत असे. त्यांची निवड समिती आमच्या ट्रस्टतर्फे निवड करण्यातही मोलाची मदत करत असे. आम्ही अमेरिकेत अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या विद्यापीठाजवळ रहाणारे एखादे कुटुंब सुचवत असू. त्याचा ह्या मुलांना फारच आधार वाटे. तेव्हा इंटरनेटचा प्रसार फारसा नव्हता. त्यामुळे अमेरीका फारच परकी वाटे. तेव्हा बँकांचे अशा मुलांना शिक्षण कर्ज मिळत नसे. तेव्हा हे एक हजार डॉलर फारच मोलाचे वाटत. नव्या मुलांना आमचे जुने शिष्यवृत्ती मिळवलेले विद्यार्थी मदत करण्यात तत्पर असत. सर्व जुने नवे व ट्रस्टी एकमेकांच्या संपर्कात असत.

आम्ही आत्तापर्यंत सुमारे ४० मुलांना ही शिष्यवृत्ती दिली आहे. त्यापैकी सर्वांनीच एम.एस.ची पदवी सन्मानाने मिळवली. त्यापैकी ८-९ जण तर पी.एच.डी पर्यंत पोहचले. अजूनही हा उपक्रम चालू असून मेसार्ग हे आता एक कुटुंबच झाले आहे. खास उल्लेख करायचा म्हणजे ह्यात ५० टक्के विद्यार्थिनी

होत्या. त्यातले बहुतेक सर्वजण आता अमेरिकेतच स्थिरावले आहेत. अशा रितीने मी ह्या ४० जणांचा बर्वेकाका झालो आहे हे माझं भाग्य व काळे सरांना ही नातवंडे आज लाभली आहेत हे त्यांचे स्मारक.

मेसार्गला नंतर अनेक ट्रस्टी व देणगीदार अमेरिकेत मिळाले. पण सर्वात महत्वाचे म्हणजे माझा मित्र (माझ्याप्रमाणे त्यालादेखील शिष्यवृत्ती मिळाली होती) डॉ. गोखले व त्याची सुविद्य पत्नी मेली एलन. २००१ साली ह्या ट्रस्टची स्थापना डॉ. गोखल्यांच्या घरीच डॅनबरी कनेक्टिकट येथे झाली. दरवर्षी ह्या ट्रस्टतर्फे देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती बद्दल www.mesarg.org ह्या वेबसाईटवर साधारण मे महिन्यात माहिती प्रसिध्द करण्यात येते व यशस्वी मुलांना ऑगस्ट महिन्यात ही शिष्यवृत्ती देण्यात येते. गरजूंनी वरील वेबसाईट अवश्य बघावी.

अजुनही एक उल्लेख करणे आवश्यक आहे की, आमच्या २-३ विद्यार्थ्यांनी त्यांची स्वतंत्र पण अशाच प्रकारची शिष्यवृत्ती चालू केली आहे. मी सुरवातीला उल्लेख केला ती ही शृंखला. माणसांना असे काही गळ्यात अडकवण्यात आनंदच वाटतो. माझ्या ह्या ४० पैकी बहुतेक पुतण्यांनी त्यांच्या लग्नकार्याचे आमंत्रण आम्हाला अगत्याने पाठवले. मीषण शक्य तेव्हा उपस्थित रहात असे. अशाच एका लग्नप्रसंगी आमच्या एका विद्यार्थिनीने तिच्या आईवडिलांची ओळख करून दिली. तेव्हा तिच्या आईने मला वाकून नमस्कार केला. संकोचून मी म्हणालो, ''तुमची मुलगी अत्यंत हुशार होती म्हणून आम्ही तिला ही शिष्यवृत्ती दिली.'' त्यावर त्या उत्तरल्या, ''ते मला पण माहित आहे. पण हा नमस्कार माझ्या मुलीसाठी नाहीच! तुम्ही ज्या ४० मुलांना मदत केलीत त्यांच्या आयांच्या वतीने केलेला हा नमस्कार आहे. तुम्ही मला भेटलात पण सगळ्याना भेटला असालच असे नाही.'' तेव्हा मी पुन्हा एकदा अवाक झालो. क्षणात मला उमजले की तो नमस्कार मला नव्हताच. तो नमस्कार होता काळे सरांना. ह्या दुसऱ्या शृंखलेच्या निर्मात्याला. मी होतो फक्त एक माध्यम.

**-सुरेश (रा.त्रिं.) बर्वे**
**24449413**




।।श्री।।

१० जून २०१५

वसंता,

तुझे पत्र मिळाले. वेळ जात नाही ही तक्रार मला मान्य नाही. तब्येतीच्या तक्रारी समजू शकतो. इतकी वर्षे दगदग केल्याने काही व्याधी उपटणार हे गृहीत धरले पाहिजे. अवि आणि अंजू परदेशात आहेत, त्यांचे चांगले चालले आहे. आणखी काय हवे?

तुझा वेळ जात नाही यावर एक उत्तर आहे माझ्याकडे. माझा एक दोस्त आहे. नाव दोस्त हेच. तुझ्याकडे सांगण्यासारखे खूप आहे, हा माझा दोस्त ऐकायला तयार असतो, तासाचे १००० रुपये घेतो. श्री रामजी देवस्थान संस्थान, आपटे नावाने धनादेश द्यायचा, शनिवार रविवार सोडून वेळ ठरवायची. दिलेल्या वेळेला तो दारात उभा राहील. गप्पीष्ट आहे. तुझ्या पदरी पुण्य आणि आनंदही.

त्याचा भ्रमणध्वनी 9819421858

माझा संदर्भ दे. नाहीतर मला विसरशील.

आपल्या कॉलेजातील पोरांचं गेटटुगेदर ठरतंय. त्याबद्दल पुढच्या पत्रात.

सोमाजी गोमाजी कापसे

(जाहिरात)





संध्याकाळ. दादर रेल्वे स्थानक. नेहमीची गर्दी. आभाळ भरुन आले होते. कोणत्याही क्षणी पाऊस येईल अशी भीती प्रत्येकाच्या मनात होती. 'घरी पोहोचलो एकदा की पड हवा तेवढा,' अशीच प्रार्थना जो तो मनात करत झपाझप घराकडे धाव घेत होता. बऱ्याच जणांकडे छत्र्या नव्हत्या. ज्यांच्याकडे होत्या ते बहुधा छत्री ओली होईल या काळजीत असावेत. अविनाशला तनुजाची आठवण झाली. तिला भिजायला खूप आवडायचं. पाऊस आणि हापूस वर्षभर पडला तरी मला आवडेल. तनुजा म्हणायची. ''वेडी आहेस'' - अविनाश म्हणायचा. ''थोडक्यात मजा आहे.''

त्यावर तिचे ही उत्तर ठरलेले..

''एक वर्ष दोघे बारा महिने राहिले तर कळेल.''

''तू शॉवरखाली उभी रहा वर्षभर.''. अविनाश म्हणाला,

''आणि हापूस ?....''

अविनाशच्या डोळ्यात पाणी आलं.

(या कथेचा शेवट करून वाचकांनी पोस्टाने अथवा इमेल द्वारे पाठवावा. अंतिम तारीख २० जून २०१५)
E: svayambsm@gmail.com

# नातीगोती

## यशवंत हो ऽऽ जयवंत हो

-गणेश आचवल

मित्रांनो, हा लेख तुमच्या हाती पडेपर्यंत बहुदा बारावी आणि दहावी दोघांचेही निकाल लागले असतील. आपल्या आयुष्यात दहावी आणि बारावी परीक्षा हा तर खूप महत्त्वाचा विषय असतो. त्यामुळे त्या निकालाची जास्त उत्सुकता असते कारण त्यानंतर विद्यार्थ्यांचे आयुष्य वेगळे वळण घेणार असते. एक काळ असा होता म्हणजे आमच्या वडिलांच्या किंवा काकांच्या पिढीचा, तेव्हा म्हणे अकरावी मॅट्रीक होतं आणि तेव्हा पास झालेल्या विद्यार्थ्यांचे नंबर पेपरात छापून यायचे. मी दहावीत असताना निकाल दुपारी जाहीर व्हायचा आणि गुणपत्रिका दुसऱ्या दिवशी लगेच मिळायच्या. गेले काही वर्ष मात्र हे चित्र बदलले आहे. निकालाची नेमकी तारीख जाहीर होते आणि मग संकेतस्थळावर निकाल पाहता येतो, पक्की गुणपत्रिका एका आठवड्यानंतर मिळणार असते. संगणकाच्या या युगाचा हा परिणाम, मग त्यानंतर ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेला सुरवात होते. कॉलेज सुरु व्हायला मात्र जुलै महिनाच उजाडतो.

खरं सांगायचं तर आज दहावी काय किंवा बारावी काय, या सर्व विद्यार्थ्यांच्यापुढे करिअरची मोठी दालने खुली झाली आहेत. पण तरीही काही वेळा चुकीच्या निर्णयामुळे किंवा पालकांच्या दबावामुळे मुले चुकीचा निर्णय घेतात आणि मग नंतर स्ट्रेसखाली वावरू लागतात.

आमच्या परिचयाचं एक कुटुंब. मुलगी अतिशय उत्तम कविता करायची, गोष्टी लिहायची, तिने खरं तर कला शाखेत जायला हवे होते. पण तिच्या बाबांनी तिला शास्त्रशाखेत घातलं. मग हल्लीच्या जमान्यानुसार क्लासेस सुरु झाले आणि मग तिला त्या बिझी शेड्युलचा कंटाळा आला. तिला शास्त्रशाखेत रस वाटेना, तिची भाषांची आवड, तिच्या कविता, सगळे बाजूला पडले होते. मग शेवटी तिने स्पष्टपणे वडिलांना सांगितलं की तिला शास्त्रशाखेत शिक्षण घ्यायचे नाही आहे...आता काय करणार? क्लासला लाखभर फी भरली होती, कॉलेजची पहिली टर्म संपत आली होती. एक वर्षाची तिची गॅप झाली, पण मुलीने नंतर कलाशाखेत प्रवेश घेतला आणि तिथे ती चांगले मार्कस् मिळवू लागली. वडिलांनी तिचे ऐकल्याबद्दल त्यांना धन्यवादच द्यायला हवेत.

बारावीनंतर हल्ली एक बी.एम.एम. अभ्यासक्रम गेली अनेक वर्षे विद्यापीठाने सुरु केला आहे. प्रसारमाध्यमाच्या आकर्षणापायी मुले इथे येतात खरी, पण प्रसार माध्यमात करिअर करणे एवढे सोपे आहे कां? मुळात त्यांना आपली भाषा सुधारायला हवी. हल्ली इंग्रजी माध्यमात शिकलेली मराठी मुले भन्नाट मराठी बोलतात आणि तरीही त्यांना एखाद्या वाहिनीचा निवेदक व्हायचे असते. हल्ली तर वर्तमानपत्राच्या पुरवणीत तर फक्त कॉलेजचे मजकूर असतात आणि ही पिढी स्वतःला रिपोर्टर म्हणून मिरवू लागले. एखाद्या एकांकिकेत काम करणाऱ्या एखाद्या मुलाला आपण स्टार झालो असे वाटू लागते. मुलाला म्हणण्यापेक्षा त्या मुलाच्या किंवा मुलीच्या पालकांना आपल्या मुलाने टीव्हीवर चमकावे असे वाटू लागते. प्रसिद्धीच्या मागे धावणारी ही काही मुले आणि त्यांचे पालक फक्त धावत जातात, पण हे मृगजळ आहे हे कळायला मात्र उशीर झालेला असतो.


काही रिॲलिटी शो मुळे हॉटेल व्यवस्थापन या क्षेत्राला पण ग्लॅमर प्राप्त झाल्याचे दिसते. त्यामुळे त्या क्षेत्राची नीट माहिती नसून सुद्धा एखादा मुलगा हॉटेल व्यवस्थापन क्षेत्रात जाण्यासाठी धडपडू लागतो. मुख्य म्हणजे आपला नेमका कल कोणत्या शाखेकडे आहे आणि कोणत्या क्षेत्रात करिअरच्या काय संधी आहेत याचा मुलांनी आणि पालकांनी नीट विचार करायला हवा.

आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे आणि खरे तर हा चक्रव्यूह आहे. इथे प्रचंड मेहनत करण्याची गरज आहे. आज असे दिसते की मुलमुलींना झटपट यश हवे आहे. पण झटपट यश कसे मिळेल? त्याकरिता प्रयत्न हवेत, नियोजन हवे, आपल्यात कुठले गुण आहेत आणि आपल्या काय मर्यादा आहेत हे प्रत्येकाने ओळखायला हवे.

असेच आणखी एक उदाहरण. एक मिडिया वर्कशॉप सुरु होते. त्यांच्यासमोर एक परिचयाचा चेहरा होता. त्या मुलाचे नाव तन्मय. काही वर्षांपूर्वी तन्मय त्या सरांकडे मराठीच्या ट्युशनला जात होता. त्यांच्या माहितीनुसार त्याने अभियांत्रिकी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला होता. व्याख्यान झाल्यावर तन्मय स्वतःहून त्यांना भेटायला गेला आणि म्हणाला, ''सर, तुमच्या चेहऱ्यावरचे प्रश्नचिन्ह मी समजू शकतो. सर, मी इंजिनिअरिंगचे शिक्षण सोडून बी.एम.एस.चा अभ्यासक्रम करीत आहे.'' तन्मय बारावी सायन्स शिकून इंजिनिअरिंगला गेला होता, पण वर्ष संपता संपता त्याला लिखाणात करिअर करावे असे डोक्यात आले. त्याने हे त्यांच्या पालकांना समजावून सांगितले आणि त्यांना ते पटले. आज तन्मय विविध मालिकांचे लेखन करत आहे.

पालकांची बाजूसुद्धा मुलांनी समजून घेणे आहे. वडील किंवा आई जेंव्हा मुलाच्या किंवा मुलीच्या एखाद्या करिअरला पाठिंबा देत नसेल तर त्यामागची कारणे जाणून घेणे गरजेचे आहे. बऱ्याचदा पालकांना त्या करिअर विषयी नीट माहिती नसते, त्यामुळे ते साशंक असतात. मुलाला जाणून बुजून ते विरोध करत नसतात. अशावेळी त्या संदर्भात योग्य विचार विनिमय होणे गरजेचे आहे आणि त्यासाठी आवश्यक आहे तो संवाद. जर पालक-मुलांमध्ये सुसंवाद असेल तर करिअरची वाट अधिक सोपी होईल.

करिअरचा निर्णय घेताना तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन जरुर घ्या. कदाचित निर्णय घ्यायला थोडा वेळ लागले, पण आपला निर्णय चुकीचा असणार नाही याची मनाशी नक्कीच खात्री करुन घ्या. यशवंत व्हा. जयवंत व्हा.



-गणेश आचवल
9833268391
athatharvbharadwaj@gmail.com

## नातं -जनार्दन जोशी

आपलेपणाचे नातं हीच एक प्रत्येकाच्या शेवटच्या श्वासापर्यंत टिकणारी, त्याला आयुष्याशी घट्ट जोडून ठेवणारी अमूल्य अशी ठेव आहे. माणसामाणसातील अक्षय नाती, आपलेपणाची भावना यासारखं मौल्यवान दुसरं काहीही नाही, याची जाणीव जेव्हा आपल्याला होते तेव्हा आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलून जातो.

पैसा-अडका, जमीन-जुमला, सौंदर्य, बुद्धिमत्ता, यश, कीर्ती सर्व काही मिळवल्यानंतरही ते सुख उपभोगण्यासाठी अथवा सर्व काही उतरणीला लागल्यावर संकटांचे डोंगर कोसळू लागल्यावर सहानुभूतीच्या शब्दाला आधार देण्यासाठी, जवळच्या प्रेमाच्या स्नेहाच्या नात्यांची गरज प्रत्येकालाच भासते हे वास्तव आहे.

लग्नासारख्या आनंदाच्या प्रसंगी म्हणूनच स्नेह्या-सोबत्यांना व दूरदूरच्या नातेवाईकांनाही आमंत्रणे दिली जातात. तर एखाद्याचा इहलोकीचा प्रवास संपल्यावर नात्यागोत्यांचे सर्व नातेवाईक सुहृद एकत्र जमून बरोबर घालविलेल्या बऱ्यावाईट क्षणांचा लेखाजोखा घेतात. मागे उरलेल्यांसाठी ही आपलेपणाची भावना फार फार सुखावणारी, दिलासा देणारी असते, नाही का?

जीवनांतील सौंदर्याचा - आनंदाचा आस्वाद जर शेवटपर्यंत घ्यायचा असेल तर नातीगोती टिकविण्याशिवाय व सुदृढ करण्याशिवाय पर्याय नाही.

वानप्रस्थानाच्या निमित्ताने दूर जंगलात - आश्रमात राहणे, तपाचरण, सर्वसंगपरित्याग करणारे ऋषीमुनी, मुक्त होऊ पाहणारे लोक यांच्या या संकल्पना आमच्या युगात मागे पडत आहेत. विरक्तीपेक्षा आसक्तीच माणसाला अगदी शेवटच्या टप्प्यातही अधिक भुलवीत आहे. शेवटपर्यंत, श्वासाच्या अखेरपर्यंत आयुष्य रसरसून जगणे अधिक आकर्षक वाटू लागले आहे जन सामान्यांना.

नात्याची विभागणी तीन टप्प्यात करता येते. १. रक्ताची नाती २. कायद्याची नाती ३. स्नेहाची नाती. परंतु यातील सीमारेषा अत्यंत धूसर व एकमेकांवर अतिक्रमण करणाऱ्या असतात. सर्वात सुदृढ नाती रक्ताची असतात. हे नैसर्गिक नाते असते. यात गैरसमज, रागलोभ असे खाचखळगे असले तरी प्रेमाचा अंतस्थ झरा सहसा आटत नाही. आईवडिल, भाऊ-बहीण, काका, मामा, आत्या, मावश्या, भाचे, पुतणे अशी नाती अनेक वादळं पचवूनही टिकून राहतात. त्यातील मायेचा ओलावा सहसा आटत नाही. अल्पवेळचा दुरावा सांधला जाऊ शकतो. कायद्याची नाती फार अवघड असतात. नवरा-बायको, सासू-सासरे, सून, दीर-नणंदा या नात्यांची मुद्दाम बांधणी करावी लागते. ही नाती टिकवणं अत्यंत अवघड असते.

मैत्रीची नाती खूप सखोल नसली तरी निर्मळ-निर्व्याज आनंद देणारी असतात. ती पूर्णपणे स्वेच्छेने निर्माण झालेली असतात. त्यात जबरदस्तीचा भाग नसतो. मानवणार नाही तेव्हा पूर्ण विराम देण्याची सवलत त्यात असते. अर्थात, ज्याला जमेल तशी त्याने नात्यांची जपणूक करावयाचा अधिकार प्रत्येकाला आहे.

**-जनार्दन जोशी, ठाणे**



***सुप्रसिद्ध इतिहासकार आणि फर्डे वक्ते श्री. निनाद बेडेकर यांचे नुकतेच निधन झाले. त्यांना आदरांजली***

आम्ही आज पोरके झालो. आमचे गुरु, मार्गदर्शक, पितृतुल्य असे ज्येष्ठ इतिहास संशोधक श्री. निनाद बेडेकर काका आज आम्हाला आणि आमच्यासारख्या असंख्य विद्यार्थ्यांना सोडून गेले. ज्यांचा हात धरून आम्ही इतिहास शिकलो नाही तर इतिहास जगलो. इतिहासातील बारकावे कसे तपासावे, पुरावे कसे ओळखायचे, ह्या सर्वांचे शिक्षण आम्हाला त्यांनीच दिले. त्यांच्या व्यक्तिमत्वाबद्दल काय बोलावे. अगदी निर्मळ, एक चालता फिरता Encyclopedia, शाहजी राजांपासून ते सावरकर यांच्यापर्यंत त्यांचा अभ्यास. कवी भूषण शिवाजी राजांच्या काळात झाला खरा पण ह्या २१व्या शतकात कवी भूषणची गोडी आम्हाला निनादरावांमुळेच लागली.

कोणतीही शंका कधीही विचारा उत्तर तुम्हाला मिळतेच. आता आम्ही कोणाला शंका विचारायची? हक्काने कोणाला फोन करायचा? फोनवरचा त्यांचा आवाज आता कधीच ऐकू येणार नाही. त्यांच्या फोनची ती अरेबिक रिंगटोन आता कधीच कानावर पडणार नाही. वेळ प्रसंगी कसलाही संकोच न ठेवता ''विशाल गाडी काढ'' असं म्हणून टू-व्हिलरवर बसणारे निनाद काका आता कधीच मागच्या सीटवर बसणार नाहीत. ४ दिवसाच्या मध्यप्रदेश किंवा मुम्बईमधले किल्ले किंवा महाराष्ट्रातले किल्ले फिरताना आमच्या बरोबर असलेले निनाद काका आता आमच्या बरोबर गाडीत असणार नाहीत. थोरल्या बाजीराव पेशव्यांच्या समाधीवर जात असताना त्यांनी सांगितलेली झिनत अजीझानची गोष्ट आता आम्हाला कोण सांगणार? हातात कोणताही कागद नसताना ३ दिवस पानिपतवर व्याख्यान ऐकण्यासाठी १०० वर्षात कधीही न भरलेली भारत इतिहास संशोधन मंडळाची वास्तु आता अशी तुडुंब भरेल काय?

एक एक शब्द लिहिताना डोळ्यात अश्रु तर आहेच पण त्या अश्रुंना वाट करून देण्याचे धाडस होत नाहिये. मरण तर कोणाला चुकले नाही पण हा असा दिवस आम्ही एवढ्या लवकर बघू हे स्वप्नात पण वाटले नव्हते. निनाद काका आज शरीराने आमच्यात नसतील खरे पण त्यानी जी कायम सत्याच्या बाजूने उभे राहण्याची शिकवण दिली, त्यांच्या सोबत राहून जो अनुभव मिळाला त्याची शिदोरी कायम सोबत राहील.

कोणतीही अपेक्षा न ठेवता सदैव पाठीशी खंबीरपणे उभे असलेल्या व्यासरुपी श्री. निनाद बेडेकर काका यांना आमच्या आणि त्यांच्या असंख्य विद्यार्थ्यांकडून साष्टांग नमस्कार.

**-विशाल खुळे, प्रणव महाजन, उमेश जोशी**

# वटपौर्णिमा आणि पर्यावरण

**-शशिकांत काळे**

वटपौर्णिमा, दसरा हे सण आले की पर्यावरणवादी जागे होतात. मग दूरदर्शन, रेडिओ, वर्तमानपत्रे ह्या माध्यमातून आपल्या प्रथांमुळे पर्यावरणाचा आपण किती नाश करतो आहोत हे सांगितले जाते.

पण जरा विचार करा. वडाची किंवा आपट्याच्या पानांची आपण एका दिवसात किती तोड करतो? त्या तोडीमुळे त्या झाडाचे किती नुकसान होते? तसे पहायला गेलो तर ही एकाच दिवसात होणारी तोड निसर्ग काही दिवसातच भरून काढीत असतो. ह्या झाडांना संबंध वर्षात आपण साधे चुळकाभर पाणी सुद्धा घालत नाही. किंवा मुठभर खतही घालत नाही. पूर्वीच्या काळी कोकणात जेवणावळीसाठी पत्रावळी वापरत असत. त्या पत्रावळीसाठी वडाची किंवा फणसाची पानेच वापरली जात असत. त्या वर्षभर होणाऱ्या तोडीला पुरूनही ही वडाची झाडे जोमाने वाढत असत. कोणताही माळी सांगेल की काही काळानंतर प्रत्येक झाडाची वाढ खुंटते. त्या नंतर त्या झाडाची छाटणी करावीच लागते. लिंबू, संत्रे, द्राक्षे, मोगरा, गुलाब यासारख्या झाडांची छाटणी करावीच लागते. त्याशिवाय नवीन फुटवा येणार नाही. वडाची किंवा आपट्याची झाडे पण याला अपवाद नाहीत. मग ह्या छोट्याशा तोडणीसाठी एवढा आरडा ओरडा कशाला? नाक्या नाक्यावर दिसणाऱ्या ढिगांना की छोटेसे म्हणतो. कारण हे ढीग फक्त शहरातच दिसतात. शहरांत तर फांदी तोडण्यासाठी वडाचे झाडही शिल्लक ठेवलेले नाहीये. खेड्यातील स्त्रिया बहुदा पारावरच पूजा करतात.

दुसरी गोष्ट म्हणजे दसरा दिवाळीला झेंडूंच्या फुलांची तोरणे लावली जातात. तेव्हा सुद्धा आंबा किंवा अशोकाच्या पानांचे ढीगही सर्वत्र दिसतात. त्या ढीगांमुळे पर्यावरणाचा नाश होत आहे असे कुणी म्हटल्याचे माझ्या ऐकिवात नाही. ही झेंडूची फुले पिकवण्यासाठी उपजाऊ जमीन वापरली जाते. पाणी दिले जाते. निगराणीसाठी कित्येक मनुष्यबळ खर्च होत असतात. त्याला ह्या पर्यावरणवाद्यांचा विरोध नसतो. मग ज्या झाडांना साधे चुळकभर पाणी सुध्दा घातले जात नाही त्याबद्दल एवढी आरडाओरड कां?

हे तर काहीच नाही. हल्ली उठल्यासुटल्या भेटपत्रे पाठवण्याची पध्दत रुढ होते आहे. भेट कार्डाचा हा पांढरा शुभ्र कागद बनवण्यासाठी साधी पाने किंवा फांद्या चालत नाहीत, तर संबंध झाडच समूळ नष्ट केले जाते. त्या नंतरही कागद बनवतांना शुद्ध पाणी, कागद सुकवण्यासाठी प्रचंड ऊर्जा, तसेच अनेक घातक रसायने पण वापरली जातात. एका आपट्याच्या किंवा अगदी वडाच्या पानांपेक्षाही ही भेटपत्रे मोठी असतात. मग पर्यावरणाचा जास्त नाश कशामुळे होतो हे त्या पर्यावरणवाद्यांनीच सांगावे. हेच पर्यावरणाचा पुळका असलेले लोक हॉटेलमध्ये गेल्यानंतर तिथे ठेवलेले फुकटांत मिळणाऱ्या कागदाला घासागणिक तोंड पुसत असतात. तेव्हा त्यांना पर्यावरणाची आठवण येत नाही? काही दिवसांपूर्वी मुलांच्या डायपर बद्दलचा एक लेख वाचनात आला होता त्यातील महत्वाचे मुद्दे असे आहेत.

१. एक डायपर तयार करण्यासाठी एक झाड खर्ची पडते.

२. डायपरसाठी वापरले जाणारे वेलक्रो, इलॅस्टिक हे पदार्थही मातीत मिसळले जात नाहीत. त्यामुळे डायपरचे विघटन व्हायला ५०० वर्षे लागतात.

३. कचऱ्यातील डायपर उंदीर, घुशींनी खाल्लाने रोग फैलावतात.

हे सर्व माहित असूनही पर्यावरणवादी डायपर किंवा सॅनिटरी टॉवेल्सना विरोध करीत नाहीत. कारण भेटपत्रे किंवा डायपर बनवणाऱ्या बहुसंख्य उत्पादकांमागे परदेशी कंपन्या आणि त्यांचे हितसंबंध आहेत. त्यामुळे जाहिरातींच्या जोरावर त्या आपला माल खपवीत आहेत. पण वडाची फांदी पुजणाऱ्या, आपट्याची पाने लुटणाऱ्या भारतीयांच्या मागे कोण आहेत? पाश्चात्य देशात ह्या चाली नाहीत. म्हणून भारतीय लोक प्रतिगामी आहेत? ह्या चाली पर्यावरणाला घातक ठरवल्या जात आहेत. आम्ही भारतीय किती प्रतिगामी आहोत, हे स्वत:लाच पटवून देण्यात धन्यता मानत आहेत. आणि प्रत्येक प्रसंगी भेट पत्रे पाठवणारे मात्र आधुनिक ठरत आहेत.

वडाची लहानशी फांदी तोडणारे किंवा आपट्याची पाने सोने म्हणून लुटणारे जर पर्यावरणाचे शत्रू ठरत असतील तर ह्याच वडाच्या किंवा आपट्याच्या पानांपेक्षा कित्येक मोठ्या आकाराचे भेट पत्र व्हॅलेंटाईन डे ला देणारे किती ऱ्हास करीत असतील? पण हा प्रश्न पर्यावरणवादी विचारणार नाहीत. कारण ती पाश्चात्य म्हणूनच सुसंस्कृत लोकांची प्रथा आहे. ह्या जगामध्ये कित्येक वने ही फक्त भेट पत्रे बनवण्याच्या कागदासाठीच नष्ट होत आहेत. हे जगन्मान्य सत्य आहे.

भारतातच नव्हे तर जगभर घरांभोवती, आस्थापनांभोवती हिरवळी जोपासल्या जातात. बागा तयार केल्या जातात. त्यांचा उद्देश वनसंपदा वाढावी हा नसतो तर सुशोभिकरण हा असतो. मग त्यासाठी हजारो लिटर पाणी फवारले जात असते. त्यामुळे हिरवळ तसेच बागायती झाडे वाढतात पण त्यांची वाढही विशिष्ट मर्यादिपर्यंतच होऊ दिली जाते. निव्वळ सुशोभिकरणासाठीच त्या हिरवळीची, झाडांची कत्तल केली जाते. ह्या छाटणीमुळे गाडीभर कचरा वाहून न्यावा लागतो. वडाची एक फांदी वर्षातून एकदाच तोडण्याच्या तुलनेत ही वर्षभर होणारी वृक्षतोड कित्येक पटीनी जास्त आहे. पण त्याबद्दल कुणी बोलत नाही.

दसऱ्याला सोने लुटणे ही सामाजिक परंपरा आहे. त्यामुळे परस्परांशी संपर्क साधला जात असतो. पण आता आपल्या चलभाष यंत्रावरून 'हॅपी दसरा' असा संदेश पाठवला की आमची जबाबदारी संपते आहे. आपट्याचे एक पान आपण वाचवलेले असते. पण एक गोष्ट लक्षात येते का? ही सेवा सतत वीज वापरत असते. जरी तुम्ही संच वापरत नसला तरी सुद्धा ते यंत्र 'मी इथे इथे आहे' हा संदेश जगभर प्रसारित करीत असतंच. म्हणून तर जगातील कुठल्याही ठिकाणाहून तुमच्याशी संपर्क साधता येतो.

वडाची फांदी पुजावी किंवा नाही? सोने म्हणून आपट्याची पाने खुडावीत किंवा नाही? हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे. पण त्यासाठी पर्यावरणाचे कारण पुढे करणे हे मात्र ढोंग आहे. म्हणून ह्या पुढे जेव्हा पर्यावरणाची सबब सांगाल त्यावेळी स्वत:ला खालील प्रश्न जरूर विचारा.

१. मी भेटपत्र पाठवतो का?


२. मी भ्रमणध्वनीवर किती वेळा फालतू गप्पा मारतो? कारण मी बोलत असलेल्या प्रत्येक क्षणासाठी मी वीज वापरत असतो. आणि ती वीज वातावरण प्रदुषित करीत असते.

**-शशिकांत काळे**
9975244467

## डायोजिनिस

-मुक्ता कान्हेरे

सद्गुण आणि दुर्गुणांचा मिलाप म्हणजे माणूस होय. सद्गुणांपेक्षा दुर्गुणच जास्त. मद, मत्सर, स्वार्थ, कपट, राग, द्वेष ह्या सहागुणांनी भरलेला पण स्वयंसिध्द हा माणूस निराळा असतो. अशी स्वयंसिध्द माणसे फार थोडी. त्यासाठी हाताची सर्व बोटे उघडायला लागत नाहीत.



कधीतरी मन आकर्षित व्हावं असं त्याच्याजवळ काही नसते. एक प्रकारच्या गूढ अवगुंठनात तो वावरत असतो. त्याच्या नजरेतच ते दिसते. तो मंत्री किंवा प्रेसिडेंट नसतो. त्याच्याजवळ सत्ता नसते, सिंहासन नसते, पण तो जाईल तिथे त्याच्यासाठी सिंहासन तयार होते.

तो स्वयंसिध्द माणूस चालायला लागला की, एखादा सम्राट चालत आहे असे वाटते. ही जी श्रीमंती असते ती उपजत त्याच्याजवळ असते. बाह्य जगाशी त्याचा काहीही संबंध नसतो. त्याचे उदाहरण म्हणजे ' डायोजिनिस'. हा सिंकदरचा समकालीन. त्याच्याबद्दल अनेक आख्यायिका सिकंदरच्या कानावर पडत होत्या. एक दिवस अशीच एक हकीकत ऐकल्यावर सिकंदर बेचैन झाला. त्याला भेटल्याशिवाय आपल्याला बरे वाटणार नाही हे सिकंदरच्या लक्षात आले.

तो त्याचा शोध घेत आला. डायोजिनिस त्यावेळी आंघोळ करून तिथल्या खडकावर कोवळ्या उन्हात पडला होता. हे सिकंदरला जाणवले नाही. पशुपक्षी नग्न आहेत असं कधी आपल्याला जाणवते कां? त्याच्याप्रमाणे डायोजिनिसची नग्नता सिकंदरला नैसर्गिक वाटली. अंगावर सावली पडली म्हणून डायोजिनिसनी मागे वळून पाहिले, तो सम्राट सिकंदर. सिकंदर म्हणाला, ''मी जगज्जेता सम्राट सिकंदर. या क्षणी तू मागशील ती गोष्ट मी तुला देऊ शकतो.'' डायोजिनिस हसला, म्हणाला, ''मला काही नको, पाणी प्यायला भांडे होते पण जेव्हा मी बघितले, कुत्री, मांजरे नदीत सरळ तोंड घालून पाणी पितात, तेव्हा ते भांडे अडचण नको म्हणून फेकून दिले. त्यातून तुला काही द्यायचं असेल तर तू माझ्यापासून दूर हो. माझ्या शरीराला मिळणाऱ्या सूर्यप्रकाशाच्या आड येवू नकोस, आयुष्यात कोणाच्याच प्रकाशाच्या आड येवू नकोस.'' त्याक्षणी सिकंदरला डायोजिनिसचा हेवा वाटला. तो म्हणाला, ''मला वाटतं, ह्याक्षणी तुझ्याजवळ येवून शांत बसावे''. डायोजिनिस म्हणाला, ''हा क्षण पकड आणि ये इथं ''. सिकंदर गडबडला. मनाची चलबिचल लपवित म्हणाला, ''अजून एक राज्य जिंकायचं आहे, ते जिंकलं की सगळं जग माझ्या ताब्यात आलं''.


डायोजिनिस उपहासाने हसला. म्हणाला, ''एकही देश न जिंकता मी इथं शांतपणे पडलो आहे, तुला काय हरकत आहे, हे जग तू जिंकशील पण असंच दुसरं जग असेल तर?'' निरुत्तर होऊन सिकंदर परतला.

..असा असतो स्वयंसिध्द माणूस....डायोजिनिस सारखा!

**-मुक्ता कान्हेरे**

आ.स.क्र.४८२१



















**-मंजिरी वैद्य**

उत्तर पुढील अंकात...

# व्हॅ'नीला'

## श्रोता लक्षेषु

-नीला वैशंपायन

**।। शतेषु जयते शूरः सहस्त्रेषुच पंडितः**
**वक्ता दशसहत्रेषु दाता भवती वा न वा ।।**

शंभरात एखादाच शूर, हजारात एखादाच ज्ञानी, वक्ता दहा हजारात एक तर दाता ???.....त्याची तर वानवाच..!!!!

दात्याच्या तसेच वक्त्याच्या दुर्मिळतेच वर्णन करणारं हे सुभाषित. प्रभावी वक्तृत्व नक्कीच दुर्मिळ....पण ऐकायला श्रोतेच नसतील तर?

श्रोते नसले तरी व्याख्यान Record करुन ठेवण्याची जी सोय उपलब्ध झालीये त्यासाठी ह्या वैज्ञानिकांचे आभारच मानायला हवेत, कारण आजकाल श्रोत्यांची मात्र वानवाच झाली आहे. पोटतिडकीने एखादा काहीतरी सांगत असतो. किंवा काही तरी सांगायचं असतं पण जीवाचे कान करून ऐकणे ही म्हण इतिहास जमा झाल्यागत सद्य स्थिती आहे. बदललेल्या सामाजिक स्थितीचा परामर्श घेणं हा ह्या लेखाचा उद्देश नाही. पण संवाद कधी पूर्ण होतो? तर विचार, आदेश, भावना दुसऱ्यापर्यंत पोचतात तेव्हाच!! मग महत्वाचं कोण? बोलणारा? वक्ता? की ग्रहण करणारा? Recepient?

**न सांगताच तू मला उमगते सारे**
**कळतात तुलाही मौनातील इशारे**
**दोघात कशाला मग शब्दांचा बांध**
**कळण्याचा चाले कळण्याशी संवाद।।**

इतकी पराकोटीची समरसता नवरा बायकोतही क्वचित आढळते. परा पश्यन्ति मध्यमा वैखरी पैकी संवादाची ही पश्यन्ति अवस्था. मग हा संवाद पती पत्नी मधला असो की माय लेकरातला. लेकरू वर्षाच्या आतलं असेपर्यंत त्यांच्यात असा संवाद होतोच. वर्षाच्या आतलं तान्हं बाळ वेळी अवेळी रडतं. मायेनं सांभाळ करणाऱ्या आई/आजीला बरोब्बर कळतं बाळ कां रडतंय ते. भूक लागली? कपडे ओले झाले? कान दुखतोय? पोट दुखतंय? मुंगी चावली? कारणं अनेक व्यक्त होण्याचं माध्यम एकच. रडणे. पण हा संवाद पोचतो, त्याला साजेशी कृती होते आणि मग खुदकन हसून बाळ शांत झोपी जातं, तेव्हा संवाद पूर्ण होतो.

मुलं थोडीशी मोठी झाली की आईच्या मोठ्या डोळ्यांकडे पाहून क्वचित मुलं गप्प बसत (हा भूतकाळ झाला कां?) पण मुलं मोठी झाली की मग उलटं मात्र कधीच घडत नाही. आईला काय म्हणायचं आहे ते न सांगताच काय, सांगूनही मुलांच्या कानात शिरत नाही हे वास्तव आपण स्वीकारतो.

संवाद हा वक्त्याला जे म्हणायचं आहे ते आणि तेच श्रोत्याने ग्रहण केलं तरच पूर्ण होतो. जर ते अगदी तंतोतंत समजलं तर किंवा समजण्यात चूक झाली तर काय होतं याचे अनेक दाखले अगदी इतिहासातसुद्धा सापडतात.

रामाबरोबर वनवासात रहायला गेलेल्या सीतेने जे ऐकायला नको ते ऐकल्यामुळे आणि जे ऐकायलाच हवं ते न ऐकल्यामुळे रामायण घडलं. पुढेसुद्धा प्रभू श्रीरामाने धोब्याचं ऐकल्यामुळे सीतामाईला अग्निदिव्य करावं लागलं.

गांधारीला आपल्या दिव्यदृष्टीचं कवच दुर्योधनाला द्यायचं होतं. तसं तिने स्पष्ट सांगूनही दुर्योधनाने श्रीकृष्णाचं ऐकल्यामुळे भीमाला त्याचा अंत करता आला.

नजरकैदेतल्या सखारामबापू आणि देवाजीपंत यांच्या भेटीच्या वेळचा संवाद हा उत्कृष्ट अप्रत्यक्ष संवादाचा एक नमुना म्हणायला हवा. माधवरावांनी आपल्या अत्यंत विश्वासातल्या केशवला भेटीचा वृतांत विचारला. त्या दोघांमध्ये काय बोलणं झालं हे विचारलं असता बुद्धिबळ खेळणाऱ्या आश्रिताला ''राजा दोन घरं मागे घ्या'' एवढंच ते म्हणाले, असं केशवाने सांगितलं. या एका वाक्याचे दोन श्रोते. एक देवाजीपंत, जे नागपूरकर भोसल्यांचे वकील होते आणि दुसरे खुद्द माधवराव. आश्रिताला सांगितलेल्या चालीचा परिणाम काय होणार याची माधवरावांना कल्पना आली आणि दोन दिवसात बातमी पोचली. स्वारीसाठी नागपूरहून दोन मुक्कामी पुढे आलेले भोसले पुन्हा नागपूर मुक्कामी पोचले.

खाणाखुणांची भाषा नजरेचे, नजरेचे इशारे हाही संवाद साधण्याचा एक प्रकार प्रेमात पडलेल्या जीवाला तू 'नजरेने हो म्हटले' हे बरोब्बर समजतं तर जागरूक आईला 'गालावरच्या खुणा बघुनी' काहीतरी घडल्याचं अंदाज बांधता येतो. कुणी मुद्दाम काही सांगत नसूनही जे सांगितलं जातं ते एखाद्याला कळतं.

रेल्वे लोकल हा समस्त मुंबईकरांचा जिव्हाळ्याचा विषय! सुटत असलेली गाडी



धावत येऊन पकडणाऱ्याची देहबोली पाहिलीये? त्यांचं (तिचंसुद्धा) उद्दिष्ट एकच गाडी पकडणे. बोम्बलत नाही, ''ए बाजू व्हा, बाजू व्हा मी गाडी पकडतोय.'' फक्त देहबोली सांगत असते ''जरा जागा द्या मी चढतोय.'' आणि दरवाज्यात उभ असलेले? त्यांनाही मुद्दाम बघावं. पाय ठेवायला २/४ इंचाची पोकळी तयार करून हात पसरलेले असतात. ''चढ तू आम्ही आहोत. तू नाही पडणार ह्याची काळजी घेऊ आम्ही.''

एकाचा संवाद दुसऱ्याला कळला नाही तर? कल्पनाही नाही करू शकत नं? अगदी रोजची 'शब्देविण संवादु' उदाहरणं. बसचा कन्डक्टर बेल वाजवून सूचना देतो. चालकाने ऐकल्याच नाही तर? आपली सिग्नल यंत्रणा कोणी लक्षच नाही दिलं तर? पत्रावरचा पिनकोड क्रमांक आपलं गंतव्य स्थान निव्वळ ६ आकड्यात सांगत असतं. किती कळतं? ज्याला काहीच समजत नाही त्याच्या हातात पडलं तर? पोचेल का जिथे पोचायला हवं तिथे? रस्त्यावर थुंकू नका, कचरा टाकू नका, रेल्वे रुळ ओलांडू नका अशा घोषणा होतच असतात तरीही......

३१ मे हा जागतिक तंबाखु विरोधी दिवस. 'तंबाखुचे सेवन आरोग्यास हानिकारक आहे' असा वैधानिक इशारा देऊनही दरवर्षी तंबाखु

सेवनामुळे हजारो मृत्युमुखी पडतात. या अशा घोषणा होत असतात, सगळ्यांच्या कानावर पडतात, पण ऐकल्या न गेल्यामुळे परिणाम ढिम्म असतो, याचा आणखी काय वेगळा पुरावा हवा ?

वाहणारा नळ बंद करणाऱ्या माकडाची व्हिडीओ क्लिप सामाजिक बांधिलकी म्हणून सगळीकडे पाठवणारे आपण घरात मात्र नळाची ठिपिक ठीपिक किती जणाना त्रास देते? नळ चालू राहिलाय म्हणून फारच थोडे उठून नळ बंद करतात.

आनंद यादवांची 'माऊली' कादंबरी. प्राणी सुद्धा संवाद साधतात ह्याचा प्रत्यय देणारी ही कादंबरी. आपली दोन्ही पिल्लं दोन वेगवेगळ्या ठिकाणी बळी गेली आहेत हे कळल्यावर ती मांजरी असहाय्यपणे विलाप करत. उच्चार म्याव असाच. ह्यापेक्षा काय वेगळा असणार? पण यादवांपर्यंत पोचलेली ती असहाय्यता इतकी समर्थपणे त्यांनी मांडली आहे की, खरंच प्राण्यांचे उच्चार ऐकण्याचा एक नवा दृष्टीकोन मिळालाय असंच जाणवतं.

खूप वर्षापूर्वी कॉलेज संपल्यानंतरच्या सुट्टीत आम्ही एका मैत्रिणीच्या गावाला गेलो होतो. मांसाहार न करणारी मी एकटीच. रोजच्याप्रमाणे पक्षांच्या किलबिलाटाने, कोंबड्यांच्या आरवण्याने जाग आली. पण आज कोंबड्यांच्या आरवण्यात दु:ख जाणवत होतं. अत्यंत करूण स्वरात कोंबड्या आरवत होत्या. चक्क रडण्याचा सूर जाणवत होता. दुपारी जेवायला बसलो तेव्हा सकाळचे आर्त स्वर पंगतीत बाकीच्यांच्या जिव्हा तृप्त करत होते. त्यांचा संवाद फक्त माझ्यापर्यंतच पोचला असं म्हणायचं का ?

गुजरात भूकंप झाला तेव्हा तिकडचे कुत्रे १-२ दिवस नाहीसे झाले होते असं वाचल्याचं आठवतं. माझी एक मैत्रीण मानसरोवर प्रदक्षिणेला गेली होती. बरोबर जे घोडे होते ते एका ठराविक ठिकाणी पुढे जायलाच तयार नव्हते. शहरी माणसाना काही कळत नव्हतं पण स्थानिकांनी सांगितले, ''मागे फिरा. वादळ, पाऊस तत्सम काहीतरी होणार आहे.'' ते नंतर खरं ठरलं. निसर्ग सांगत होता, आपण ऐकण्याच्या पलीकडे असतो.

वाहनांची वर्दळ, हॉर्न, एसी, टीव्हीचे आवाज, पंख्यांची घरघर ह्या सगळयात अगदी दादरमधेसुद्धा पोपट, कोकीळ, तांबट असे अनेक सुंदर पक्षी आपलं अस्तित्व जाणवून देण्याचा प्रयत्न करतात. आपल्या धबडग्यात किती ऐकतो आपण त्यांना? गाडी चालवताना चालक हॉर्न देतो पण कानात मोबाईल अडकवून चालताना आजूबाजूचं भानच रहात नाही. तर कधी ह्याच्या अगदी उलट, मोबाईल कानाला लावून मोटरसायकल चालवताना आजूबाजूचे लोक ओरडतात. पण न ऐकल्यामुळे एखादा निरागस जीव फरफटला जातो.

श्रोता म्हणजे श्रवण करणारा, ग्रहण करणारा.... परमेश्वराने म्हणूनच तर आपल्याला बोलण्यासाठी एकच तोंड पण ऐकण्यासाठी दोन कान आणि पाहण्यासाठी दोन डोळे अशी प्रत्येकी दोन ग्रहणेन्द्रिये दिली आहेत. कानावर बरंच काही पडतं पण ऐकलं जातं का? असा जर विचार केला तर वक्त्या इतकाच श्रोताही दुर्मिळ झालाय. म्हणूनच 'वक्ता जर दशसहत्रेषु' तर 'श्रोता लक्षेषु' असंच म्हणावसं वाटतं.



**-नीला वैशंपायन**
**9920329214**
wneela@gmail.com

**१८ मे २०१५ रोजी झालेल्या ॲड. अविनाश भिडे (चेअरमन, बार कौन्सिल, महाराष्ट्र अँड गोवा) यांच्या व्याख्यानाचा थोडक्यात गोषवारा.**

- आपल्याला पोलिस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवायची असल्यास पी एस ओ (पोलिस स्टेशन ऑफिसर) ला भेटणे आवश्यक असते. तक्रार नोंदवल्यानंतर ती वाचून पहाणे आवश्यक आहे, तसेच त्याची एक प्रत मागून घेणे आवश्यक आहे.
- दूरध्वनीद्वारे तक्रार नोंदवल्यास फोन रजिस्टर मध्ये नोंदवली जाते. त्यामुळे तक्रार क्रमांक मागावा.
- चोरी झाल्यास...

१. मोबाईल - प्रत्येक हॅंडसेटचा इएमआयइ नंबर असतो, तो सांगावा. त्यामुळे मोबाईल टॉवरद्वारा त्याचे लोकेशन कळते.

२. वाहन - प्रत्येक वाहनाचा इंजिन नंबर, चेसिस नंबर असतो. तो माहित असणे गरजेचे आहे.

- कोणत्याही चोरीची तक्रार नोंदवायची असल्यास त्याच्या खरेदीच्या पावत्या सांभाळून ठेवाव्यात.
- फेसबुकसारख्या सोशल साईटवर आपण जर कुठे पर्यटनाला गेला असाल तर प्रवासा दरम्यान फोटो काढू नयेत. त्यामुळे चोरांना घर बंद असल्याची कुणकुण लागते व चोरी होण्याची शक्यता वाढते. प्रवास संपवून घरी पोहोचल्यावर अशी कोणतीही माहिती सोशल साईटवर देणे सुरक्षित असते.
- एखादा धनादेश खात्यात पुरेसे पैसे नसल्याने परत आला तर, १५ दिवसांच्या आत नोटीस देणे गरजेचे आहे. नोटीस मिळाल्यानंतर धनादेश देणाऱ्याने एक महिन्याच्या आत पैसे दिले तर तो गुन्हा ठरत नाही, अन्यथा क्रिमीनल केस होऊ शकते.
- विवाह नोंदणी, कौटुंबिक वाटणी, पासपोर्ट, व्हिसा इ. साठी सब-रजिस्ट्रारकडे अर्ज करणे आवश्यक आहे.
- मृत्युपत्र -

१. नोंदवायची गरज नाही.

२. मालमत्तेची यादी वर्णनासकट असावी.

३. ज्या वारसदारांना वाटा द्यायचा आहे किंवा नाही. त्यांचे स्पष्ट वर्णन असावे.

४. सख्ख्या नातेवाईकांव्यतिरिक्त जर कोणाला हिस्सा द्यायचा असेल तर त्याची कारणे, हेतू देणे आवश्यक आहे.

५. स्वअक्षरात लिहावे.

६. ज्यांना मृत्युपत्राद्वारे कोणताही फायदा नाही, अशा दोन साक्षीदारांची निवड करावी. साक्षीदारांना मृत्युपत्रातील माहिती दाखवण्याची गरज नाही.

७. मृत्युपत्रकर्त्याच्या डॉक्टरचे फिटनेस सर्टिफिकेट जोडावे.

८. साक्षीदार व मृत्युपत्रकर्ता यांनी एकमेकांसमक्ष सह्या केल्या आहेत असे लिहावे.

९. मृत्युपत्र बदलले तर पूर्वीचे मृत्युपत्र रद्द समजावे, असा उल्लेख करणे अत्यावश्यक आहे.

# मायबोली मराठीत साकारले - ‘ऋग्वेदातील’ एक सूक्त !




‘वेदो नारायण : साक्षात’ असे एक वचन आहे. ‘वेद’ हे परमेश्वराचे वाङ्‌:मयीन रुपच आहे. याज्ञवल्क्य स्मृतिनुसार...‘वेदाध्ययनाची परंपरा अखंड चालू रहावी, याच हेतूने ब्रह्मदेवाने घोर तपश्चर्या करून ब्राह्मण वर्ण (वर्ग) मुद्दाम निर्माण केला आहे.’ त्यामुळे, जो कोणी ही परंपरा स्वेच्छेने व केवळ ‘कर्तव्य’ म्हणून निष्ठेने पार पाडत असेल त्यालाच ‘ब्राह्मण’ म्हणणे जास्त समर्पक ठरेल ! ऋग्वेदात एकूण १०५५२ मंत्र (ऋचा) आहेत. त्यापैकी केवळ एकाच मंत्राचा अभ्यास करायला मला तब्बल ६ महिने लागले. ऋचेचा अर्थ समजला पण त्याचबरोबर हेही लक्षात आले की, ‘मी ब्राह्मणच नाही.’ ऋग्वेदाच्या एकाच ऋचेने मला माझी जागा दाखवून दिली. अगदी काल-परवापर्यंत छाती फुगवून मी सर्वांना सांगत असे की, ‘मी ब्राह्मण आहे’. परंतु आता मात्र मी अगदी मनमोकळे पणाने सांगू शकतो की, मी सध्या तरी ‘ब्राह्मण’ नाही. मात्र ‘ब्राह्मण’ ही सर्वश्रेष्ठ पदवी मिळवण्यासाठी, मी मनापासून प्रयत्न करतोय !

ऋग्वेदाच्या एका ऋचेचा सखोल अभ्यास केल्यानंतर, ‘चित्पावन कोकणस्थ ब्राह्मण’ या विषयी सविस्तर लेख लिहिण्याची स्फूर्ती झाली. नुकतेच, एका जाणकार व्यक्तीने सुचवल्या-प्रमाणे, ऋग्वेदातील एका सूक्ताचा बारकाईने अभ्यास करून, ते सूक्त ‘मायबोली मराठीत’ पद्य रुपात साकारले आहे.

वाचकाला मूळ ‘संस्कृत ऋचा’ जरी समजली नाही तरी त्या ऋचेचा भावार्थ मराठी भाषेत व्यक्त केल्यामुळे, तो कोणालाही सहज समजेल. इतक्या सोप्या शब्दात मांडला आहे. तो भावार्थ सर्वांनाच आवडेल, अशी खात्री वाटते.

(संदर्भ - ऋग्वेद संहिता - मंडल क्र. १०, सूक्त क्र. ७५)
ऋषी - प्रियमेधा, ऋषींचा पुत्र - सिंधुक्षित ऋषी
छंद - जगती, देवता - नद्या

**सूक्त क्र. ७५.......ऋचा १**

**प्र सु व आपो महिमानमुत्तमं कारुर्वोचाति सदने विवस्वत : ।**
**प्र सत्पसत्प त्रेधा हि चक्रमु : प्र सृत्वरिणामति सिन्धुरोजसा ।।१।।**

**ऋचेचा मराठी भावार्थ (पद्यमय)**

स्वर्लोकातुनि धरणीवरती, सप्तनद्या अवतरल्या ।
खळखळणाऱ्या शुध्द जलाने, प्रदेश फुलवित गेल्या ।।१।।
समृध्दीने, जन ही सारे आनंदित झाले ।
वनस्पतींसह पशुपक्षीही तुष्ट-पुष्ट जाहले ।।२।।
या आनंदा कारण असती ‘सप्तनद्यांचे’ प्रवाह हे ।
म्हणूनी ऋषिंनी, त्या सरितांना ‘देव-रुप’ मानिले ।।३।।
मंगलकारक दिव्य ऋचा या वर्णिती सप्तनद्यांना ।
कृतज्ञतेचे स्मरण करवुनी, जागविती त्या सकल जना ।।४।।
लौकिकदृष्टया जरि या केवळ ‘जलप्रवाह’ असती ।
थोर मनाचे ऋषिगण त्यांना ‘जलदेवता’ म्हणती ।।५।।
सप्तनद्यांनी मिळून झाली, महाकाय सिंधु।
सिंधुनिवासी ‘सिंधुक्षित ऋषि’ तिची महानता गाई ।।६।।

**ऋचा क्र. २.....**

**प्र ते रदद्वरुणो यातवे पथ : सिन्धो यद्वाजां अभ्यद्रवस्त्वम ।**
**भूम्या अधि प्रवता यासि सानुना यदेषामग्रं जगतामिरज्यसि ।।२।।**

वाहू लागली सिंधु जेव्हा, प्रदेशाकडे ।
स्वागत करण्या वरुण धावला, सिंधुप्रदेशाते ।।१।।
तयार केला मार्ग तयाने, खोल उताराचा ।
तेव्हा सिंधु वाहू लागली, सखल प्रदेशाकडे ।।२।।
धनधान्याने बहरून गेला, सारा ‘सिंधु’ प्रदेश ।
‘जीवनधारा’ नाव सार्थ हे तिला प्राप्त झाले ।।३।।

**ऋचा क्र. ३......**

**दिवि स्वनो यतते भूम्योपर्यनन्तं शुष्ममुदियर्ति भानुना ।**
**अभ्रादिव प्र स्तनयन्ति वृष्ट्य :सिन्धुर्यदेति वृषाभो न रोरुवत ।।३।।**

प्रचंड करित गर्जना ‘सिंधु’ ही, सुसाट वाहतसे ।
‘प्रवाहध्वनि’ तिचा थेट जातसे गगना भेदुनि पुढे ।।१।।
वेगवान हा प्रवाह सिंधुचा, सदैव गर्जत असे ।
जणु उधळल्या वृषभापरि हा रोंरावत राहे ।।२।।
मेघगर्जनेपरि ‘ध्वनि’ तिचा, सदैव ऐकू येई ।
जनास भासे ‘सिंधुसरिता’, आकाशासुनि येई ।।३।।

ऋचा क्र. ४.....

**अभि त्वा सिन्धो शिशुमिन्न मातरो वाश्रा अर्षन्ति पयसेव धेनवः।**
**राजेव युध्वा नयसि त्वमित्सिचौ यदासामग्रं प्रवतामिनक्षसि ।।४।।**

मार्गामध्ये असंख्य सरिता सिंधुला मिळती ।
प्रेमानंदे जणू बालिका, 'माता' आलिंगिती ।।१।।
नवजात वासरा धेनु जैशी प्रेमाने पाहते ।
तशीच 'सिंधु' इतर नद्यांना न्याहाळत राहते ।।२।।
दुग्धपान देऊनी, धेनु जशी, तृप्त मनी होते ।
इतर नद्यांना घेऊनि संगे, 'सिंधु' संतोषते ।।३।।
सवे घेऊनि अंकित राजे, नृपती रणि धावे ।
इतर नद्यांना संगे घेऊनि, बलाढ्य सिंधु वाहे ।।४।।

ऋचा क्र. ५.....

**इमं मे गंगे यमुने सरस्वति शुंतुद्रि स्तोमं सचता परुष्ण्या ।**
**मरुदवृधे वितस्तयार्जीकीये श्रुणुह्या असिक्न्या सुषेमया ।।५।।**

हे गंगे, हे यमुने, सरस्वती हे, नदीतमे माते ।
हे परुष्णी, हे असिक्नी, हे सरिते तू मरुदवृधे माते ।।१।।
हे वितस्ता, आर्जीकीया, हे जलधारा सुशोमा ।
मी सिंधुक्षित ऋषि, गातो महिमा, तुमचा नित्य पहा ।।२।।
ऋषि प्रार्थितो सकल नद्यांना, ऐकावी ही स्तुतिसुमने ।
एकची समयी, ती सर्वांना, ऐकवीन मी प्रेमाने ।।३।।

ऋचा क्र. ६....

**सुसर्त्वा रसया श्वेत्या तृष्टामया प्रथमं यातवे सजूः त्या ।**
**त्वं सिन्धो कभया गोमतीं क्रमं मेहत्वा सरथं याभिरीयसे ।।६।।**

रसा, कुंभा, गोमती, सुसर्तु, सहज येऊनि मिळती तुला ।
श्वेती, मेहत्नु, तशीच तुष्टामा, याही येऊनि मिळती तुला ।।१।।
पात्र तुझे विस्तीर्ण जाहले, या उपनद्यांच्या संगमे ।
म्हणून तुजला नदी न म्हणता, 'नद' हे नावच सार्थ असे ।।२।।

ऋचा क्र. ७....

**ऋजीत्येनी रुशती महित्वा परि जयंसि भरते रजांसि ।**
**अदब्धा सिंधुरपसामपस्तमाश्वा न चित्रा वपुषीव दर्शता ।।७।।**

दुथडी वाहे सिंधु नदी ही, प्रचंड वेगाने ।
जणु वाटे अति चपळ अश्वी ही, सुसाट धावत आहे ।।१।।
धवलशुभ्र फेंसाळ सिंधुचा, प्रवाह चमकत असे ।
दर्शनीय चिरतरुण यौवनाच जणु, प्रियकराप्रति धावे।।२।।

ऋचा क्र. ८....

**स्वश्वा सिन्धुः सुरथा सुवासा हिरण्ययी सुकृता वाजिनीवती ।**
**ऊर्णावती युवतिः सीलमावत्युताधि वस्ते सुभगा मधुवृधम ।।८।।**

धनधान्याने प्रदेश सारा, सिंधु फुलवित जाई ।
गाईगुरांना उदंड चारा, मुक्तपणे देई ।।१।।
मेंढीपालन प्रचंड चाले, अमाप लोकर मिळे ।
पशुपक्ष्यांना, रम्य वनश्री, भुरळ घालीतसे ।।२।।
वृक्षवेली या सदा बहरती, फळे-फुले द्यावया ।
रमणीय सिंधु ही, अद्वितीय जलधारा ।।३।।
चिरतरुणीसम मोहित करते, सिंधु सर्वांना ।
स्वर्गासम हा प्रदेश भासे, जीवांना ।।४।।

ऋचा क्र. ९...

**सुखं रथं युयुजे सिंधुरश्विनं तेन वाजं सानिषदस्मिन्नाजौ ।**
**महान ह्यस्य महिमा पनस्यते दब्धस्य स्वयशसो विरप्शिनः ।।९।।**

शीघ्र गतीने वाहे सिंधु, प्रवास सुखकर वाटे ।
सभोवतीचा निसर्ग सारा लोभवी सकल जनाते ।।१।।
सिंधुकाठी ऋषीमुनींचा यज्ञ सदोदित चाले ।
ऋषिगण सारा सिंधु-जलाचे गुणवर्णन करताहे ।।२।।

टीप : 'नदी-सूक्त' - भावार्थ पूर्ण झाला .

ब्राह्मणाला 'वेदाध्ययन करण्याची स्वाभाविकच आवड असणे' अपेक्षित आहे व त्यासाठी तो सदैव प्रयत्नशील असलाच पाहिजे.

**घोटवडेकर (बर्वे) कुलोत्पन्नः**
**श्रीकांत शर्मा माधवतनयः**
नौपाडा, ठाणे.

## ।। आरोग्यं धनसंपदा ।।

# आयुर्वेद-निरामय-सुखी जीवनाचे शास्त्र

-वैद्य सुभाष मार्लेवार

**देहप्रकृति**

प्रकृति शरीराच्या निर्मितीला कारण असलेले चेतनामय देहवर्णन हा या लेखाचा हेतू आहे.

सत्व, रज, तम हे प्रकृतीचे गुण आहेत. प्रकृति स्वभावत: 'जड' आहे पण ती आत्म्याच्या सहाय्याने जग उत्पन्न करण्यास समर्थ होते. बुद्धी ही त्रिगुणात्मक आहे (सत्व, रज, तम तिनही गुणांनी युक्त) परंतु तरीही सत्वगुण विशिष्ट असून स्फटिक मण्याप्रमाणे निर्मल (सर्व विषय ग्राहक) आहे. बुद्धी चेतनामय व इच्छाप्रधान आहे.

**अहंकाराची उत्पत्ती** - त्रिगुणात्मक बुध्दितत्वापासून त्रिगुणात्मक अहंकार उत्पन्न झाला व तोही सात्विक, राजस, तामस अशा ३ तऱ्हेचा आहे.

**अहंकार**

**सात्विक** **राजस** **तामसी**

**११ इंद्रिये**

| **५ बुध्दिंद्रिये** | **५ कर्मेंद्रिये** | **तन्मात्रा** | |
|---|---|---|---|
| नाक | वाणी | गंधत्मात्रा | : पृथ्वी महाभूत |
| कान | हात | शब्दतन्मात्रा | : आकाश महाभूत |
| डोळे | पाय | रूपतन्मात्रा | : तेज महाभूत |
| जीभ | जननेंद्रिय | रसतन्मात्रा | : आप महाभूत |
| त्वचा | गुदद्वार | स्पर्शतन्मात्रा | : वायु महाभूत |

**११ वे उभयात्मक मन**

मनाचा काहीजण बुद्धिंद्रियात समावेश करतात. मनाचा कर्मेंद्रियातही समावेश आहे (कारण मनाच्या इच्छेप्रमाणे सर्व इंद्रियांचे कार्य होत असते)

**महाभूतांचे गुण** :

**आकाश महाभूत** : शब्द, कर्ण हे अधिष्टान रोमरंध्रे, शिरा, स्नायु, अस्थि, धमनी इत्यादि अवयवातील पोकळी.

**वायुमहाभूत** : स्पर्श, त्वचा हे अधिष्टान. सर्व शरीराच्या श्वसनादिक महत्वाच्या क्रिया.

**अग्निमहाभूत** : रूप, नेत्र हे अधिष्टान पचन, दाह, जळजळ, तेजस्विता, गोरेपणा, क्रोध, शूरता.

**जलमहाभूत** : रुचि (चव), जीभ हे अधिष्ठान कठीणपणा व जडपणा.

**पृथ्वीमहाभूत** : गंध, नाक हे अधिष्टान, कठीणपणा व जडपणा.

प्रकृति हे कोणाचेही कार्य नाही, ती स्वत: सिद्ध आहे. अर्थात बुद्धी, अहंकार व पंचतन्मात्रा ही प्रकृतीची कार्ये आहेत. हस्तपादादि हा इंद्रिये, मन व पंचमहाभूते हे १६ प्रकृतीचे विकार आहेत.

याप्रमाणे चोवीस तत्वांनी सिद्ध झालेल्या शरीररुपी गृहामध्ये, शुभाशुभ कर्माचे स्वाधीन असलेला आणि मनोदूतयुक्त असलेला जीवात्मा रहातो.

**जीवाचे गुण :**

सुखाविषयी इच्छा होणे, द्वेष, प्रीती, अप्रीती, शब्दादिक विषयांचे उत्तम ज्ञान, कार्यतत्परता, मनाचे संकल्प, एखाद्या वस्तूचा चांगला वाईट विचार, पूर्वीची आठवण, निश्चयात्मक ज्ञान, श्वासोच्छवास, अधोवायुसरण नेत्रांचे निमेषोन्मेष इ. गुण जीवांचे आहेत.

हा जीवात्मा पाप व पुण्य, सुख आणि दु:ख यांनी व्याप्त असतो. मन व कृत्रिम बंधने यांनी युक्त असतो. अशा या शरीरागत जीवात्म्याला 'देही' म्हणतात.

मन हे एक उभयात्म इंद्रिय आहे. कारण मनाच्या इच्छेनुसार इतर इंद्रिये कार्य करतात.



**मनाचे कार्य :**

चिन्त्यं विचार्यमूहयंच ध्येयं संकल्पमेवच ।
यत्किंचित मनसो ज्ञेयं तत् सर्व ह्यर्थसंज्ञकम् ।।

**मनाचे दोष** :

वायु, पित्त व कफ हे तीन जसे शरीराचे दोष आहेत, त्याप्रमाणे रजोगुण व तमोगुण हे दोन मनाचे प्रमुख दोष आहेत. सत्व हा गुण मनाचा दोष होऊ शकत नाही. तो मनाचा प्रकृतीभूत गुण आहे. पण त्यात ज्यावेळी वैषम्य निर्माण होते त्यावेळी रजोगुण व तमोगुण यांची निर्मिती होते व साम्य प्रस्थापित झाल्यावर सत्व गुणाचा प्रादुर्भाव होतो. रजोगुणाची वाढ झाल्यावर काम, क्रोध, मद, मत्सर असे भाव निर्माण होतात. तमोगुणाची वाढ झाली असता भीती, आळस, खेद, अज्ञान असे भाव निर्माण होतात. मन ज्यावेळी शुध्दस्वरुपात असते, त्यावेळी बुद्धी, ज्ञान, खेद, अज्ञान असे भाव निर्माण होतात. मन ज्यावेळी शुदस्वरुपात असते, त्यावेळी बुद्धी, ज्ञान, धर्म, कृतज्ञता असे सात्विक भाव निर्माण होतात. उदा. मद, मूर्छा, उन्माद, अपस्मार हे विकार मनाच्या आश्रयाने होतात. अशावेळी रजोगुण व तमोगुण यांचे वैषम्य दूर करून सत्वगुणाची वाढ करण्याचे उपाय करावे लागतात.

(क्रमश:)



**वैद्य सुभाष मार्लेवार**
9819686299

**OPANDIT**

SHUBHAM BHAVATU

**सर्व धार्मिक विधींसाठी !**

संपूर्ण सामग्रीसहित
शास्त्रशुद्ध पद्धतीने
धार्मिक विधी करणारी एकमेव संस्था.

**आता फक्त दिवस ठरवा! बाकीची धावपळ आमच्यावर सोपवा!**

**लहान मुले/मुली आणि बाळांसाठी :**
बारसे, उष्टावण, जावळ, वाढदिवस, मुंज
**वधू आणि वर यांसाठी :** लग्न, साखरपुडा
**ज्येष्ठ नागरिकांसाठी :**
साठीशांत, पंच्याहत्तरी, ऐंशी वर्षाची शांत
**इतर पूजा आणि शांती :**
सत्यनारायण, उदकशांती, वास्तुशांती, सहस्त्रावर्तन, लघुरुद्र
**श्राद्ध विधी :**
मंत्राग्नी विधी, हिरण्य श्राद्ध, सपिंडक श्राद्ध, अंत्येष्ट विधी

**आमची वैशिष्ट्ये :**

- ३० हून अधिक गुरूजी आणि पुरोहिता उपलब्ध
- उच्च प्रतीचे पूजेचे साहित्य
- चौरंग, पाट, होमकुंड, लाकडे, माती, फुले, फळे, तोरण सहित विधीची व्यवस्था



मुंबई + उपनगरे + ठाणे

+91-9167968204
mrudula.barve@opandit.com
www.oPandit.com



**पत्ते**



पत्त्यांचे खेळ अनेक.
आम्ही करणार आहोत
पत्त्यांच्या खेळांचे संकलन.
आम्हाला खेळाचे नाव व नियमावली कळवा.

स्वयम्, ब्राह्मण सेवा मंडळ,
भवानीशंकर रोड, दादर (प), मुंबई ४०० २८
ई-मेल : svayambsm@gmail.com



**Dream Comes True! Pay 10% only.**



**Chheda Modak**
**Estate Consultant**
Vile Parle/ Andheri/ Santacruz/ Goregaon

Sales - 09821330817
08080701110

(Work Started)
Project Approved by ICICI.

**Book Your Flat in Vile Parle (East)**

OFFER 10:10:80 Scheme.
1/2/3/4 BHK Flats Available.
Datta Ramanand Society,
Hanuman Cross Rd. No.2
Complex with
Latest Amenities.















**१८ मे २०१५ रोजी झालेल्या ॲड. अविनाश भिडे (चेअरमन, बार कौन्सिल, महाराष्ट्र ॲंड गोवा) यांच्या व्याख्यानाची क्षणचित्रे**

हे मासिक सौ. कल्पना साठे यांनी ब्राह्मण सेवा मंडळ यांचेसाठी नवलाई प्रिंट हाऊस प्रा. लि. पाईपलाईन, अंधेरी पूर्व येथे छापून ब्राह्मण सेवा मंडळ, भवानीशंकर रोड, दादर येथे प्रसिद्ध केले.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संचालक व संपादक सहमत असतीलच असे नाही.